१०५

## MAHARASHTRA ACT No. XX OF 1989

## THE YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY ACT, 1989

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २९ एप्रिल १९८९ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XX OF 1989

## AN ACT TO ESTABLISH AND INCORPORATE AN OPEN UNIVERSITY IN THE STATE OF MAHARASHTRA FOR THE INTRODUCTION AND PROMOTION OF THE OPEN UNIVERSITY AND DISTANCE EDUCATION SYSTEM IN THE EDUCATIONAL PATTERN OF THE STATE

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २ मे १९८९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

**राज्याच्या शिक्षणविषयक आकृतिबंधात मुक्त विद्यापीठ व दूरता शिक्षण पद्धती सुरू करण्यासाठी आणि त्यांचे प्रचालन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात एक मुक्त विद्यापीठ स्थापन करणे व त्याचे कायद्याने संस्थापन करणे यांसाठी अधिनियम**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठीय शिक्षणाचे विकेंद्रीकरण व पुनर्रचना करण्याच्या बाबतीतील एक उपाययोजना म्हणून महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणविषयक आकृतिबंधात मुक्त विद्यापीठ व दूरता शिक्षण पद्धती सुरू करण्यासाठी आणि त्याचे प्रचालन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात एक मुक्त विद्यापीठ स्थापन करण्याकरिता व त्याचे कायद्याने संस्थापन करण्याकरिता एक कायदा करणे व त्याच्याशी संबंधित किंवा त्याला पूरक किंवा त्याच्या आनुषंगिक बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चाळिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) हा अधिनियम, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात व त्याखाली करण्यात आलेल्या परिनियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "विद्यापरिषद" म्हणजे, विद्यापीठाची विद्यापरिषद ;

(२) "प्राधिकरणे" म्हणजे संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली विद्यापीठाची प्राधिकरणे ;

(३) "व्यवस्थापन मंडळ" म्हणजे, विद्यापीठाचे व्यवस्थापन मंडळ ;

(४) "कुलपती" म्हणजे, विद्यापीठाचा कुलपती ;

(५) "दूरता शिक्षण पद्धती" म्हणजे, प्रक्षेपण, दूरप्रक्षेपण, पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम, चर्चासत्रे, संपर्क कार्यक्रम यांसारख्या कोणत्याही संज्ञापन माध्यमातून किंवा अशा दोन किंवा अधिक संयुक्त माध्यमांच्या द्वारे शिक्षण देण्याची पद्धती ;

(६) "कर्मचारी" म्हणजे, विद्यापीठाकडून नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, व यामध्ये, अध्यापक व विद्यापीठाच्या इतर विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा समावेश होतो ;

(७) "वित्तीय समिती" म्हणजे, कलम १९ अन्वये रचना करण्यात आलेली विद्यापीठाची वित्तीय समिती ;

(८) "नियोजन मंडळ" म्हणजे, कलम १८ अन्वये रचना केलेले विद्यापीठाचे नियोजन मंडळ ;

(९) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेले परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम यांद्वारे विहित केलेले ;

(१०) "मान्यताप्राप्त संस्था" म्हणजे, संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास यांकरिता स्थापन करण्यात आलेल्या ज्या संस्थेला विद्यापीठाने अशी संस्था म्हणून मान्यता दिलेली आहे अशी संस्था ;

(११) "प्रादेशिक केंद्र" म्हणजे, कोणत्याही प्रदेशातील अभ्यास केंद्रांच्या कामकाजाचे समन्वयन करण्याच्या व त्यावर देखरेख ठेवण्याच्या प्रयोजनार्थ तसेच, व्यवस्थापन मंडळ अशा केंद्रावर सोपवील अशी इतर कार्ये पार पाडण्याकरिता स्थापन करण्यात आलेले किंवा चालवण्यात आलेले केंद्र ;

(१२) "विनियम" म्हणजे, या अधिनियमाखालील विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने केलेले विनियम;

(१३) "अनुसूचित जाती" म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येणाऱ्या जाती, वंश किंवा जमाती किंवा अशा जाती, वंश किंवा जमाती यांचे भाग किंवा त्यांच्यातील गट, आणि त्यामध्ये या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी नवबौद्धांचा समावेश होतो;

(१४) "अनुसूचित जमाती" म्हणजे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या जमाती किंवा जनजाती किंवा अशा जमाती किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यांच्यातील गट, आणि त्यामध्ये या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी निरधिसूचित (Denotified) व भटक्या जमातींचा समावेश होतो ;

(१५) "विद्यालय" म्हणजे, विद्यापीठाचे अभ्यास विद्यालय ;

(१६) "परिनियम" आणि "आदेश" म्हणजे, अनुक्रमे विद्यापीठाचे परिनियम आणि आदेश;

(१७) "विद्यार्थी" म्हणजे, विद्यापीठाचा विद्यार्थी व यामध्ये, विद्यापीठाचा कोणताही पाठ्यक्रम पूर्ण करण्याकरिता जिने आपले नाव विद्यापीठात नोंदविले आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(१८) "अभ्यास केंद्र" म्हणजे, विद्यार्थ्यांना सल्ला देणे, समुपदेश करणे, त्यांचे मूल्यमापन करणे किंवा विद्यार्थ्यांना आवश्यक ते कोणतेही सहाय्य देणे या प्रयोजनांकरिता विद्यापीठाने स्थापन केलेले, चालवलेले किंवा मान्यता दिलेले केंद्र ;

९८८८

(१९) "अध्यापक" म्हणजे, विद्यापीठाचा कोणताही पाठ्यक्रम पुरा करण्याच्या कामी विद्यार्थ्यांना विद्यापीठात शिकविण्यासाठी किंवा मार्गदर्शन करण्यासाठी किंवा त्यांना सहाय्य देण्यासाठी असलेले प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते व आदेशाद्वारे पदनिर्देशित केलेल्या अशा कोणत्याही इतर व्यक्ती;

(२०) "विद्यापीठ" म्हणजे, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ";

(२१) "कुलगुरू" म्हणजे विद्यापीठाचे कुलगुरू.

**विद्यापीठाची स्थापना व कायद्याने संस्थापन.**

३. (१) "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ" या नावाचे एक विद्यापीठ स्थापन करण्यात येईल.

(२) विद्यापीठाचे मुख्यालय हे, नाशिक या ठिकाणी असेल व विद्यापीठ त्याला योग्य वाटेल त्या-प्रमाणे राज्यातील इतर ठिकाणी संस्था, शाळा, प्रादेशिक केंद्रे व अभ्यास केंद्रे स्थापन करू शकेल, चालवू शकेल किंवा त्यांना मान्यता देऊ शकेल.

(३) पहिले कुलगुरू व व्यवस्थापन मंडळ, विद्यापरिषद व नियोजन मंडळ यांचे सुरुवातीचे सदस्य यांचा व त्यानंतर असे अधिकारी किंवा सदस्य होतील अशा सर्व व्यक्ती, जोवर त्या असे पद किंवा सदस्यत्व धारण करीत राहतील तोवर त्यांचा अंतर्भाव करून याद्वारे त्यांचा एक निगम-निकाय स्थापन करण्यात येत आहे व त्याचे नाव "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ" असे असल्याचे घोषित करण्यात येत आहे आणि अशा निगम-निकायास अखंड उत्तराधिकारांची परंपरा असेल व त्याची एक सामाईक मोहोर असेल व त्यास किंवा त्यावर उक्त नावाने दावा लावता येईल.

**विद्यापीठाची उद्दिष्टे.**

४. कोणत्याही संज्ञापन तंत्राचा वापर करणे, अधिकांश जनतेला उच्च शिक्षणाच्या संधी पुरविणे आणि एकंदर समाजाच्या शैक्षणिक सुस्थितीची तरतूद करणे आणि राज्याच्या शिक्षणविषयक आकृतिबंधामध्ये मुक्त विद्यापीठांना व दूरता शिक्षण पद्धतीला उत्तेजन देणे यांचा समावेश असलेल्या विविध माध्यमांतून विद्या व ज्ञान देणे व त्यांचा प्रसार करणे ही या विद्यापीठाची उद्दिष्टे असतील. तसेच विद्यापीठ, आपल्या कार्यांची व्यवस्था लावताना पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांचा योग्य तो विचार करील.

**विद्यापीठाचे अधिकार.**

५. (१) विद्यापीठास पुढील अधिकार असतील :—

(एक) विद्यापीठ वेळोवेळी ठरवील अशा ज्ञानाच्या, तंत्रशास्त्राच्या, व्यवसायांच्या व पेशांच्या शाखांमध्ये शिक्षण देण्याची तरतूद करणे आणि संशोधनासाठी व विस्तारासाठी तरतूद करणे;

(दोन) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे यांचा किंवा इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता पाठ्यक्रम आखणे व विहित करणे;

(तीन) परीक्षा घेणे आणि परिनियम व आदेश यांमध्ये घालून दिलेल्या रीतीने ज्यांनी एखादा पाठ्यक्रम पूर्ण केला आहे किंवा संशोधन केले आहे अशा व्यक्तींना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे किंवा इतर विद्याविषयक विशेष उपाधी किंवा मान्यता प्रदान करणे;

(चार) परिनियमांद्वारे घालून देण्यात आलेल्या रीतीने सन्मान्य पदव्या किंवा इतर विशेष उपाधी प्रदान करणे;

(पाच) विद्यापीठाच्या विद्याविषयक कार्यक्रमांच्या संबंधात दूरता शिक्षणाची सांगड कोणत्या रीतीने घालता येईल ते ठरविणे;

(सहा) शिकवणे अथवा शिक्षणविषयक साहित्य तयार करणे अथवा मार्गदर्शन करणे, पाठ्यक्रम आखणे व तो विद्यार्थ्यांना अवगत करून देणे व विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचे मूल्यमापन करणे यांसारखी विद्याविषयक इतर कार्ये करणे यांकरिता आवश्यक असलेली प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता यांची पदे किंवा इतर विद्याविषयक पदे सुरू करणे, त्यांच्या अर्हता विहित करणे;

(सात) अध्यापक म्हणून व्यक्तींची नियुक्ती करणे किंवा त्यांना मान्यता देणे;

(आठ) इतर विद्यापीठांशी व उच्च शिक्षण देणाऱ्या परिसंस्थांशी, व्यावसायिक संस्थांशी व संघटनांशी, विद्यापीठास आवश्यक वाटेल अशा कारणांकरिता सहकार्य करणे व त्यांचे सहकार्य मिळविणे ;

(नऊ) विश्वस्त निधी व दाननिधी धारण करणे व त्यांची व्यवस्था पाहाणे आणि अधिछात्रवृत्त्या, छात्रवृत्त्या, पदके, पारितोषिके व गुणवत्तेला मान्यता देण्यासाठी विद्यापीठास योग्य वाटतील असे इतर पुरस्कार सुरू करणे व ते प्रदान करणे ;

(दहा) विद्यापीठाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येतील अशी प्रादेशिक केंद्रे स्थापन करणे, ती चालवणे किंवा त्यांना मान्यता देणे ;

(अकरा) परिनियमांद्वारे घालून देण्यात येईल अशा रीतीने अभ्यास केंद्रे स्थापन करणे, ती चालवणे किंवा त्यांना मान्यता देणे ;

(बारा) फिल्म्स्, कॅसेट्स, टेप्स्, व्हीडिओ कॅसेट्स आणि इतर सॉफ्टवेअर यांसारखे शिक्षणालागणारे साहित्य तयार करण्याची तरतूद करणे;

(तेरा) उजळणी पाठ्यक्रम आयोजित करणे, कार्यशाळा चालवणे आणि अध्यापक, पाठलेखक (लेसन रायटर्स), मूल्यांकनकर्ते (इव्हॅल्यूएटर्स), आणि उत्तर विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्यासाठी परिसंवाद व इतर कार्यक्रम आयोजित करणे ;

(चौदा) इतर विद्यापीठे, परिसंस्था किंवा उच्च शिक्षणाची इतर ठिकाणे यांमधील अभ्यासाचे कालावधी (मग ते पूर्णकालिक असोत किंवा अंशकालिक असोत) किंवा परीक्षा यांना या विद्यापीठातील अध्यासाचे कालावधी किंवा परीक्षा यांच्याशी समतुल्य म्हणून, मान्यता देणे आणि अशी मान्यता कोणत्याही वेळी काढून घेणे ;

(पंधरा) शिक्षणविषयक तंत्रशास्त्र आणि तत्संबंधित बाबी यांच्या संशोधनाची व विकासाची तरतूद करणे ;

(सोळा) प्रशासकीय लिपिकवर्गीय आणि इतर आवश्यक ती पदे निर्माण करणे व त्या पदावर नेमणुका करणे ;

(सतरा) शैक्षणिक व इतर सामाजिक किंवा राष्ट्रीय कारणांसाठी दान, देणग्या आणि भेटवस्तू स्वीकारणे आणि त्यांचे योग्य ते हिशेब ठेवणे :

(अठरा) स्थावर व जंगम या दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करणे व धारण करणे विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी विद्यापीठाकडे निहित असलेली किंवा विद्यापीठ संपादन करील अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता भाडेपट्ट्याने घेणे, विकणे किंवा अन्यथा ती हस्तांतरित करणे किंवा तिची विल्हेवाट करणे, आणि करार, तसेच, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे ;

परंतु, स्थावर मालमत्ता अशा कोणत्याही प्रकारे भाडेपट्ट्याने देणे, तिची हस्तांतरणाद्वारे विक्री करणे या गोष्टी राज्य शासनाच्या पूर्वसंमतीशिवाय करता येणार नाहीत :

आणखी असे की विद्यापीठाच्या हितसंबंधाच्या दृष्टीने अशी कोणतीही मालमत्ता भाडेपट्ट्याने दिली पाहिजे, विकली पाहिजे किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यात किंवा तिची विल्हेवाट करण्यात आली पाहिजे. याबद्दल राज्य शासनाची खात्री होईल. त्याबाबतीत, राज्य शासन, विद्यापीठाला आवश्यक ते निदेश आणि विद्यापीठाने अशा निदेशांचे ताबडतोब पालन, केले पाहिजे ;

(एकोणीस) राज्य शासनाच्या मान्यतेने, विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी,—मग विद्यापीठाची मालमत्ता तारण ठेवून असो किंवा अन्यप्रकारे असो,—पैसे कर्जाऊ घेणे ;

(वीस) करार करणे, त्यांचे पालन करणे, त्यांत फेरबदल करणे किंवा त्या रद्द करणे ;

(एकवीस) आदेशांद्वारे (Ordinances) ठरवून देण्यात येईल अशी फी व इतर खर्च यांची मागणी करणे आणि ती फी व इतर खर्च वसूल करणे ;

(बावीस) विद्यार्थी व सर्व प्रवर्गातील कर्मचारी यांच्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांच्यात शिस्त राखणे आणि अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती व त्यांच्या आचारसंहिता ठरवून देणे;

(तेवीस) विद्यापीठ ठरवील अशा प्रयोजनांसाठी कोणत्याही उच्च शिक्षण संस्थांना किंवा अभ्यास संस्थांना मान्यता देणे आणि अशी मान्यता काढून घेणे;

(चोवीस) अभ्यागत प्राध्यापक, सन्मानित निवृत्त प्राध्यापक, समंत्रक, अधिछात्र, विद्याव्यासंगी, कलावंत, पाठ्यक्रम लेखक आणि विद्यापीठाच्या उद्दिष्टांच्या अभिवृद्धीस ज्या व्यक्ती हातभार लावू शकतील अशा इतर व्यक्तींची एकतर करारावर किंवा अन्यप्रकारे नेमणूक करणे;

(पंचवीस) इतर विद्यापीठे, परिसंस्था किंवा संघटना यांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना आदेशांद्वारे घालून देण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर अध्यापक म्हणून मान्यता देणे;

(सव्वीस) पाठ्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत मानके ठरविणे आणि त्याच्या शर्ती विनिर्दिष्ट करणे ; यात परीक्षा, मूल्यमापन आणि चाचणीची इतर कोणतीही पद्धती यांचा समावेश होतो ;

(सत्तावीस) कर्मचाऱ्यांचे सर्वसाधारण आरोग्य व कल्याण वृद्धींगत होईल अशी व्यवस्था करणे;

(अठ्ठावीस) विद्यापीठाच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याच्या दृष्टीने आवश्यक किंवा आनुषंगिक असतील आणि विद्यापीठाच्या सर्व किंवा कोणत्याही उद्दिष्टांच्या अभिवृद्धीच्या दृष्टीने हितावह असतील अशा इतर सर्व गोष्टी करणे.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, पोट-कलम (१) च्या तरतुदीस बाधा येऊ न देता, राज्यात मुक्त विद्यापीठ चालवण्यासाठी आणि दूरता शिक्षण पद्धती सुरू करण्यासाठी आणि अशा पद्धतीतील अध्ययन, मूल्यमापन व संशोधन यांचा दर्जा निश्चित करण्यासाठी विद्यापीठाला आवश्यक वाटतील अशा सर्व उपाययोजना करणे हे विद्यापीठाचे कर्तव्य असेल.

६. विद्यापीठास, आपल्या अधिकारांचा वापर करताना, संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर अधिकारिता असेल. अधिकारिता.

७. (१) हे विद्यापीठ, स्त्रिया किंवा पुरुष या दोघांसाठीही---मग ते कोणत्याही वंशाचे, पंथाचे, जातीचे किंवा वर्गाचे असोत---खुले असेल आणि विद्यापीठात अध्यापक म्हणून नियुक्ती होण्यास किंवा त्यातील इतर कोणतेही पद धारण करण्यास किंवा विद्यापीठात विद्यार्थी म्हणून प्रवेश मिळण्यास किंवा तेथे पदवी मिळविण्यास किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही विशेषाधिकारांचा उपभोग घेण्यास किंवा त्यांचा वापर करण्यास कोणत्याही व्यक्तीस पात्र ठरवण्याच्या दृष्टीने, तिच्यावर धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली यासंबंधीची कोणतीही कसोटी कोणत्याही व्यक्तीवर विद्यापीठाने लादणे किंवा स्वीकारायला लावणे हे विधिसंमत असणार नाही. विद्यापीठ सर्व वर्गांच्या, जातींच्या व पंथांच्या लोकांसाठी खुले असणे.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे विद्यापीठास राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेले कोणतेही निदेश असल्यास त्यानुसार, स्त्रियांना किंवा समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींना आणि विशेषतः अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना नियुक्त करणे किंवा त्यांना प्रवेश देणे यासाठी कोणत्याही विशेष तरतुदी करण्यास प्रतिबंध होतो असे समजण्यात येणार नाही.

८. (१) महाराष्ट्राचे राज्यपाल हे विद्यापीठाचे कुलपती असतील. कुलपती व त्याचे अधिकार.

(२) कुलपती हा विद्यापीठाच्या कोणत्याही कामकाजाशी संबंधित अशी माहिती किंवा अभिलेख मागवण्यास सक्षम असेल आणि कुलगुरूने ती माहिती व अभिलेख पुरवले पाहिजेत. अशी माहिती किंवा अभिलेख यांचे अवलोकन केल्यानंतर, कुलपतीस विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने किंवा त्यास योग्य वाटतील असे निदेश कुलगुरूस देण्यास कुलपती सक्षम असेल आणि कुलगुरू अशा निदेशांचे पालन करील.

(३) पोट-कलमे (४) व (५) च्या तरतुदींस अधीन राहून, कुलपतीस, विद्यापीठ, विद्यापीठाच्या इमारती, प्रयोगशाळा व सामग्री यांची, कोणतेही प्रादेशिक केंद्र किंवा अभ्यास केंद्र यांची

आणि विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षा, देण्यात येणारे शिक्षण आणि करण्यात येणारे इतर काम यांची, त्यास योग्य वाटेल अशा एका किंवा अनेक व्यक्तींकडून तपासणी करवून घेण्याचा आणि विद्यापीठाचे प्रशासन व वित्तव्यवस्था यांच्याशी संबंधित अशा कोणत्याही बाबीविषयी त्याच रीतीने चौकशी करण्याचा अधिकार असेल.

(४) कुलपती, प्रत्येक प्रकरणात अशी तपासणी किंवा चौकशी करावयाचा आपला इरादा असल्याबद्दल विद्यापीठास नोटीस देईल आणि अशी नोटीस मिळाल्यानंतर, विद्यापीठाला, नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत किंवा कुलपती ठरवील अशा इतर कोणत्याही मुदतीत त्यास आवश्यक वाटेल असे अभिवेदन कुलपतीकडे करण्याचा हक्क असेल.

(५) विद्यापीठाने कोणतेही अभिवेदन केले असल्यास, कुलपतीस पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे तपासणी किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करता येईल.

(६) कुलपतीने तपासणी किंवा चौकशी करण्याची व्यवस्था केली असेल त्याबाबतीत, विद्यापीठास, आपला एखादा प्रतिनिधी नेमण्याचा हक्क असेल व अशा प्रतिनिधीला अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी व्यक्तिशः उपस्थित राहण्याचा व आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार राहील.

(७) कुलपतीस, अशा तपासणीचा किंवा चौकशीचा निष्कर्ष व त्यावर करावयाची कारवाई यासंबंधातील आपली मते व द्यावासा वाटेल असा आपला सल्ला हे कुलगुरूस उद्देशून लेखी कळविता येतील, आणि असे लेखी निवेदन मिळाल्यानंतर, कुलगुरूने तपासणीचा किंवा चौकशीचा निष्कर्ष आणि कुलपतीची मते व त्याने दिलेला सल्ला व त्यावर करावयाची कार्यवाही व्यवस्थापन मंडळास तावडतोब कळविली पाहिजे.

(८) व्यवस्थापन मंडळ, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षावर कोणतीही कार्यवाही करण्याचे त्याने ठरविले असल्यास किंवा कार्यवाही केली असल्यास, अशी कार्यवाही कुलगुरूमार्फत कुलपतीस कळवील.

(९) कुलपतीने निश्चित केलेल्या कालावधीत, कुलपतीचे समाधान होईल अशा रीतीने व्यवस्थापन मंडळाने, कार्यवाही केली नसेल त्याबाबतीत, कुलपती, व्यवस्थापन मंडळाने दिलेल्या स्पष्टीकरणावर किंवा केलेल्या अभिवेदनावर विचार केल्यावर, त्यास योग्य वाटतील असे निदेश देऊ शकेल आणि अशा निदेशांचे पालन करणे हे व्यवस्थापन मंडळावर बंधनकारक राहील.

(१०) या कलमाच्या पूर्ववर्ती तरतुदींना बाध न येता, कुलपतीस लेखी आदेशाद्वारे, हा अधिनियम, परिनियम किंवा आदेश यांच्याशी सुसंगत नसणारा किंवा विद्यापीठाच्या हिताचा नसलेला विद्यापीठाचा कोणताही निर्णय, आदेश किंवा कार्यवाही विलोपित करता येईल, निलंबित ठेवता येईल किंवा तीमध्ये फेरबदल करता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश काढण्यापूर्वी, कुलपती, असा आदेश का काढण्यात येऊ नये याची कारणे दाखवण्याबद्दल विद्यापीठास फर्मावील आणि त्याने निश्चित केलेल्या कालमर्यादेत कोणतेही कारण दाखवण्यात आल्यास, तो त्यावर विचार करील.

(११) कुलपतीस, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे इतर अधिकारही असतील.

**विद्यापीठाचे अधिकारी.**

९. विद्यापीठाचे अधिकारी पुढीलप्रमाणे असतील.—

(१) कुलगुरू;

(२) संचालक ;

(३) कुलसचिव ;

(४) वित्त अधिकारी ; आणि

(५) विद्यापीठाचे अधिकारी म्हणून परिनियमांद्वारे घोषित करण्यात येतील असे इतर अधिकारी.

१०. (१) कुलगुरूची नियुक्ती परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा मुदतीसाठी आणि अशा सेवा-शर्तींवर व वित्तलब्धींवर कुलपतीकडून करण्यात येईल. **कुलगुरू.**

(२) कुलगुरू हा प्रमुख विद्याधिकारी आणि कार्यकारी अधिकारी असेल, आणि विद्यापीठाच्या कारभारावर देखरेख करील आणि नियंत्रण ठेवील, तसेच, विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणाचे निर्णय अंमलात आणील.

(३) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुलगुरूस, एखाद्या बाबीवर तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे असे वाटल्यास, तो या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमाखाली विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाला प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करू शकेल आणि तो अशा बाबीवर त्याने केलेल्या कारवाईसंबंधी त्या प्राधिकरणाला कळवील :

परंतु, अशी कारवाई केली जाऊ नये असे संबंधित प्राधिकरणास वाटल्यास, त्याबाबतीत त्याला ती बाब कुलपतीकडे निर्देशित करता येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल :

आणखी असे की, या पोट-कलमान्वये कुलगुरूने केलेल्या कोणत्याही कारवाईमुळे विद्यापीठाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीवर अन्याय झाला असेल त्याबाबतीत अशा व्यक्तीस, अशा कारवाईसंबंधी तिला ज्या तारखेस कळविण्यात आले असेल त्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत व्यवस्थापन मंडळाकडे अशा कारवाईविरुद्ध अपील सादर करण्याचा हक्क असेल आणि त्यानंतर व्यवस्थापन मंडळास कुलगुरूने केलेली कारवाई कायम करता येईल किंवा तीत फेरबदल करता येईल किंवा ती फिरवता येईल.

(४) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कुलगुरूस, कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही निर्णय या अधिनियमाच्या, परिनियमांच्या किंवा आदेशाच्या तरतुदींद्वारे त्यास प्रदान करण्यात आलेल्या त्या प्राधिकरणाच्या अधिकारांच्या कक्षेपलीकडचा आहे किंवा घेतलेला एखादा निर्णय विद्यापीठाच्या हिताचा नाही असे वाटल्यास, त्याला अशा संबंधित प्राधिकरणाला असा निर्णय घेतल्यापासून साठ दिवसांच्या आत त्याचे पुनर्विलोकन करण्यास फर्माविता येईल आणि त्या प्राधिकरणाने, कुलगुरूने निदेश दिल्याप्रमाणे आपल्या निर्णयाचे पूर्णपणे किंवा अंशत: पुनर्विलोकन करण्यास नकार दिल्यास किंवा साठ दिवसांच्या उक्त कालावधीत त्यासंबंधी कसलाही निर्णय घेतला नाही तर ती बाब कुलपतीकडे निर्देशित करण्यात येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, या पोट-कलमान्वये प्राधिकरणास किंवा यथास्थिति कुलपतीस अशा निर्णयाचे पुनर्विलोकन होईतोपर्यंतच्या काळात संबंधित प्राधिकरणाचा निर्णय निलंबित ठेवावा लागेल.

(५) कुलगुरू, परिनियमांन्वये आणि आदेशांन्वये (Ordinances) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

११. प्रत्येक संचालकांची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशारीतीने, अशा वित्तलब्धींवर व सेवेच्या इतर शर्तींवर करण्यात येईल आणि तो अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील. **संचालक.**

१२. (१) कुलसचिवाची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा वित्तलब्धींवर व सेवेच्या इतर शर्तींवर करण्यात येईल. **कुलसचिव.**

(२) व्यवस्थापन मंडळाने अधिकार प्रदान केलेल्या कुलसचिवास विद्यापीठाच्या वतीने करार करण्याचा, त्यावर सही करण्याचा आणि अभिलेख अधिप्रमाणित करण्याचा अधिकार असेल.

(३) प्रत्येक कुलसचिवास, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करता येईल व अशी कर्तव्ये पार पाडता येतील.

१३. वित्त अधिकाऱ्याची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा वित्तलब्धींवर व सेवेच्या इतर शर्तींवर करण्यात येईल आणि तो अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील. **वित्त अधिकारी.**

इतर अधिकारी. १४. विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची रीत, वितलब्धी अधिकार व कर्तव्ये ही, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

विद्यापीठाची प्राधिकरणे. १५. विद्यापीठाची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :—

(१) व्यवस्थापन मंडळ ;

(२) विद्यापरिषद ;

(३) नियोजन मंडळ ;

(४) वित्त समिती ;

(५) परिनियमांन्वये विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून घोषित करण्यात येतील अशी इतर प्राधिकरणे.

व्यवस्थापन मंडळ. १६. (१) व्यवस्थापन मंडळ ही विद्यापीठाची प्रमुख कार्यकारी संस्था असेल.

(२) व्यवस्थापन मंडळाची रचना, त्याच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये ही, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील.

विद्यापरिषद. १७. (१) विद्यापरिषद ही विद्यापीठाची प्रमुख विद्याविषयक संस्था असेल आणि तिचे या अधिनियमाच्या, परिनियमांच्या व आदेशांच्या तरतुदींच्या अधीनतेने, विद्यापीठातील ज्ञानाचा, शिक्षणाचा, निदेशनाचा, मूल्यमापनाचा व परीक्षेचा दर्जा राखण्याच्या बाबतीत नियंत्रण व सर्वसाधारण विनियमन असेल व त्याबद्दल ती जबाबदार राहील आणि ती परिनियमांद्वारे तिला प्रदान करण्यात येतील असे अधिकार वापरील व अशी इतर कार्ये पार पाडील.

(२) विद्यापरिषदेची रचना आणि तिच्या सदस्यांचा पदावधी हा, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

नियोजन मंडळ. १८. (१) विद्यापीठाचे एक नियोजन मंडळ स्थापन करण्यात येईल. नियोजन मंडळ ही विद्यापीठाची प्रमुख नियोजन संस्था असेल व ती विद्यापीठाच्या उद्दिष्टांत दर्शविलेल्या प्रणालीनुसार विद्यापीठाच्या विकासाचे संनियंत्रण करण्यास जबाबदार राहील.

(२) नियोजन मंडळाची रचना, त्याच्या सदस्यांचा पदावधी, त्यांचे अधिकार आणि कर्तव्ये ही, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

वित्त समिती. १९. वित्त समितीची रचना, अधिकार आणि कर्तव्ये ही, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

अन्य प्राधिकरणे. २०. जी इतर प्राधिकरणे विद्यापीठाची प्राधिकरणे असल्याचे परिनियमांद्वारे घोषित करण्यात येईल त्या प्राधिकरणांची रचना, अधिकार आणि कर्तव्ये ही, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

परिनियम. २१. या अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, परिनियमांद्वारे पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता तरतूद करता येईल :—

(अ) कुलगुरूच्या नियुक्तीची रीत, त्याचा पदावधी, त्याच्या वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती आणि त्याच्याकडून वापरले जातील असे अधिकार आणि पार पाडण्यात येतील अशी कर्तव्ये;

(ब) संचालक, कुलसचिव, वित्त अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची रीत, त्यांच्या वित्तलब्धी आणि सेवेच्या इतर शर्ती आणि प्रत्येक अधिकाऱ्याकडून वापरले जातील असे अधिकार व पार पाडण्यात येतील अशी कर्तव्ये ;

(क) विद्यापीठाचे व्यवस्थापन मंडळ आणि अन्य प्राधिकरणे यांची रचना, अशा प्राधिकरणांच्या सदस्यांचा पदावधी आणि अशा प्राधिकरणाकडून वापरले जातील असे अधिकार आणि पार पाडण्यात येतील अशी कर्तव्ये;

(ड) विद्यापीठांचे अध्यापक आणि अन्य कर्मचारी यांच्या नियुक्तीची रीत, त्यांच्या वित्तलब्धी, त्यांच्या अर्हता, आचारसंहिता आणि सेवेची समाप्ती व शिस्तभंगाची इतर कार्यवाही यांच्यासह सेवेच्या इतर शर्ती;

(इ) सन्मान्य पदव्या प्रदान करणे;

(फ) विश्वस्तव्यवस्था, मृत्युपत्रित देणग्या व दाननिधी यांचा स्वीकार करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे;

(ग) पुढील बाबतीत धोरण व प्रमाणके ठरवून देणे—

(एक) परीक्षा फी आणि परीक्षकांना, नियामकांना आणि परीक्षेच्या कामाकरिता नियुक्त करण्यात येतील अशा इतर कर्मचाऱ्यांना द्यावयाची वित्तलब्धी आणि प्रवास भत्ते व इतर भत्ते निश्चित करणे;

(दोन) उजळणी पाठ्यक्रम, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि इतर कार्यक्रम आयोजित करणे व चालवणे यांसाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांना, पाठ्यक्रम-लेखकांना, मूल्यांकनकर्त्यांना आणि विद्याविषयक इतर कर्मचाऱ्यांना द्यावयाची रक्कम;

(तीन) विद्यार्थ्यांकडून घ्यावयाच्या शिक्षण फीचे व इतर आकाराचे दर;

(चार) अभ्यागत अध्यापक, सन्मानित सेवानिवृत्त अध्यापक, संमंत्रक, सन्मान्य सदस्य विद्याव्यासंगी, कलावंत, पाठ्यक्रम-लेखक यांना द्यावयाच्या पारिश्रमिकाचे दर;

(ह) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या ज्येष्ठता-नियमनाची तत्त्वे;

(आय) विद्यापीठ आणि विद्यार्थी यांच्या दरम्यानचे विवाद मिटवण्याबाबतची कार्यपद्धती;

(ज) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये परिनियमांद्वारे तरतूद करावयाची असेल किंवा तरतूद करता येईल अशा इतर बाबी.

२२. (१) पहिले परिनियम हे, दुसऱ्या अनुसूचीत दर्शविल्याप्रमाणे असतील. परिनियम कसे करावयाचे.

(२) व्यवस्थापन मंडळ, वेळोवेळी नवीन किंवा अतिरिक्त परिनियम करू शकेल अथवा पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या परिनियमांत सुधारणा करू शकेल किंवा ते निरसित करू शकेल :

परंतु, व्यवस्थापन मंडळाला, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा दर्जा, अधिकार किंवा त्याची रचना यांवर परिणाम करणारा कोणताही परिनियम तयार करावयाचा झाल्यास किंवा एखाद्या परिनियमात सुधारणा करावयाची झाल्यास किंवा तो निरसित करावयाचा झाल्यास, व्यवस्थापन मंडळाने ठरवून दिलेल्या मुदतीच्या आत, अशा प्राधिकरणाला प्रस्तावित बदलावर आपले लेखी मत व्यक्त करण्याची वाजवी संधी दिली जाऊन याप्रमाणे व्यक्त केलेल्या कोणत्याही मतावर व्यवस्थापन मंडळाकडून विचार केला जाईपर्यंत त्यास तसे करता येणार नाही.

(३) कोणताही नवीन परिनियम करण्यासाठी किंवा परिनियमांत भर घालण्यासाठी किंवा त्यात कोणतीही सुधारणा करण्यासाठी किंवा त्याचे निरसन करण्यासाठी कुलपतीची मान्यता आवश्यक असेल; कुलपती, त्या परिनियमाला अनुमती देईल किंवा अनुमती रोखून ठेवील अथवा कुलपतीने जर काही अभिप्राय व्यक्त केला असेल तर त्याच्या अनुरोधाने त्याबाबत फेरविचार करण्यासाठी तो, ती बाब, व्यवस्थापन मंडळाकडे पाठवील.

(४) नवीन परिनियम किंवा विद्यमान परिनियमांत सुधारणा करणारा किंवा त्याचे निरसन करणारा परिनियम हा, त्याला कुलपतीने अनुमती दिलेली असल्याखेरीज विधिग्राह्य होणार नाही.

(५) पूर्ववर्ती पोट-कलमांत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कुलपती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतरच्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये, नवीन परिनियम करू शकेल किंवा आणखी परिनियम करू शकेल किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या परिनियमांत सुधारणा करू शकेल किंवा ते निरसित करू शकेल.

(६) पूर्ववर्ती पोट-कलमांत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कुलपती, स्वतः होऊन किंवा शासनाशी विचारविनिमय करून तो विनिर्दिष्ट करील अशा बाबींच्या संबंधात परिनियमांमध्ये तरतुदी करण्याविषयी विद्यापीठाला निदेश देईल आणि व्यवस्थापन मंडळास असे निदेश प्राप्त झाल्यापासून साठ दिवसांच्या आत, त्यांची अंमलबजावणी करणे शक्य झाले नाही तर, अशा निदेशाची अंमलबजावणी करणे आपणास का शक्य झाले नाही याबद्दलची कोणतीही कारणे व्यवस्थापन मंडळाने कळवली असतील तर त्यांचा विचार केल्यानंतर, कुलपतीला, अनुरूप असे परिनियम करता येतील किंवा विद्यमान परिनियमांत अनुरूप अशा सुधारणा करता येतील.

आदेश (Ordinance). २३. (१) या अधिनियमाच्या आणि परिनियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने, आदेशांमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता तरतूद करता येईल :—

(अ) विद्यार्थ्यांचा प्रवेश, अभ्यासाचे पाठ्यक्रम आणि त्यासाठी फी, पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित अर्हता, अधिछात्रवृत्त्या, पुरस्कार प्रदान करणे यासाठी आणि तत्सदृश बाबींसाठी असणाऱ्या शर्ती;

(ब) परीक्षांचे संचालन यामध्ये परीक्षकांच्या, नियामकांच्या आणि अशा इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबतच्या अटी व शर्ती आणि त्यांची कर्तव्ये यांचाही समावेश आहे;

(क) विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त आणि पुढील बाबींचा समावेश असलेल्या शिस्तभंगाबद्दल किंवा गैरवर्तणुकीबद्दल त्यांच्याविरुद्ध करावयाची कार्यवाही :—

(एक) परीक्षेत किंवा त्यासंबंधात त्याने स्वतः किंवा इतर कोणत्याही विद्यार्थ्याने गैरमार्गांचा अवलंब करणे किंवा तसे करण्यास अपप्रेरणा देणे;

(दोन) परीक्षेच्या नियंत्रक अधिकाऱ्यांकडून किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकरणाकडून करण्यात येणाऱ्या कोणत्याही अधिकृत चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्यास किंवा साक्ष देण्यास नकार देणे; किंवा

(तीन) विद्यापीठामध्ये किंवा विद्यापीठाबाहेर केलेली बेशिस्त किंवा अन्यथा आक्षेपार्ह वर्तणूक;

(ड) परीक्षा व इतर चाचण्या यांचे संचालन व परीक्षकांनी उमेदवारांचे मूल्यमापन करावयाची किंवा त्यांची परीक्षा घ्यावयाची रीत;

(इ) अभ्यास केंद्रे, मान्यताप्राप्त परिसंस्था यांची तपासणी;

(फ) विद्यापीठाकरिता किंवा विद्यापीठाच्यावतीने संविदा अथवा करार निष्पादित करण्याची पद्धती;

(ग) विद्यार्थ्यांची बदली करण्याच्या संबंधात अभ्यासकेंद्रांनी व मान्यताप्राप्त संस्थांनी पालन करावयाचे व अंमलात आणावयाचे नियम;

(ह) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याकरिता दीक्षान्त समारंभ आयोजित करणे;

(आय) राज्यातील इतर विद्यापीठांशी व इतर सांविधिक प्राधिकरणांशी सहयोग करणे आणि राज्य शासनाच्या विभागांशी सहयोग करणे;

(ज) संयुक्त प्रकल्प हाती घेण्याकरिता, कोणत्याही इतर विद्यापीठांत किंवा संघटनेत काम करणाऱ्या अध्यापकांची आणि इतर विद्याविषयक कर्मचाऱ्यांची विनिर्दिष्ट कालावधीकरिता किंवा कालावधींकरिता नियुक्ती करणे;

(के) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांमधील व्यक्तींसाठी विद्यापीठातील अध्यापकांची, अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची पुरेशी पदे राखून ठेवण्याची तरतूद करणे;

(ल) मान्यता काढून घेण्याची रीत;

(म) या अधिनियमाद्वारे किंवा परिनियमांद्वारे ज्या इतर कोणत्याही बाबींसाठी आदेशान्वये तरतूद करावयाची असते किंवा तरतूद करता येईल त्या बाबी.

(२) पहिले आदेश हे, कुलगुरूकडून कुलपतीच्या पूर्वमान्यतेने तयार करण्यात येतील आणि याप्रमाणे तयार केलेल्या आदेशांत, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व्यवस्थापन मंडळाकडून कोणत्याही वेळी सुधारणा करता येईल, ते निरसित करता येतील किंवा त्यात भर घालता येईल;

२४. विद्यापीठाच्या प्राधिकरणांना, व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेच्या अधीन राहून आपल्या स्वतःच्या कामकाजाच्या संबंधात, आणि त्यांनी स्थापन केलेल्या व ज्यांच्यासाठी या अधिनियमात, परिनियमांत किंवा आदेशांत तरतूद केलेली नाही अशा कोणत्याही समित्या असतील तर, त्या समित्यांच्या कामकाजाच्या संबंधात या अधिनियमांशी सुसंगत असे विनियम, विहित करण्यात येईल अशा रीतीने तयार करता येतील. **विनियम.**

२५. (१) हे विद्यापीठ, "विद्यापीठ निधी" नावाचा एक निधी स्थापन करील. **विद्यापीठ निधी.**

(२) पुढील रकमा विद्यापीठ निधीचा भाग बनतील, किंवा त्या विद्यापीठ निधीत जमा करण्यात येतील :—

(अ) राज्य शासन, केंद्र सरकार, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी दिलेली सर्व अंशदाने किंवा अनुदाने;

(ब) फी व आकार यांपासून येणारे उत्पन्न धरून, कोणत्याही साधनांपासून मिळणारे विद्यापीठाचे उत्पन्न;

(क) विश्वस्तव्यवस्था, मृत्युपत्रित देणग्या, दाननिधी, अर्थसहाय्य आणि इतर अनुदाने यांपासून मिळणारे सर्व उत्पन्न किंवा पैसा;

(ड) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने बँकांकडून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा.

(३) विद्यापीठाच्या खाती एका स्वतंत्र शीर्षाखाली विद्यापीठाचा एक आकस्मिक निधी असेल आणि विद्यापीठ तो चालवील. त्यामध्ये विशेषतः या प्रयोजनासाठी वेळोवेळी राज्य शासनाकडून देण्यात येतील अशा अंशदानांची किंवा अनुदानांची रक्कम त्यात जमा करण्यात येईल. अकल्पित खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी आगाऊ रकमा देण्याकरिता अशा निधीचा वापर करण्यात येईल.

(४) विद्यापीठास राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, विद्यापीठ निधीचा कोणताही भाग विद्यापीठाच्या खाती एका वेगळ्या शीर्षाखाली वेळोवेळी जमा करता येईल :

परंतु, अशा रीतीने असा वेगळा निधी ज्या उद्दिष्टांसाठी उभारण्यात आला असेल त्यांच्याशी स्पष्टपणे संबंधित असतील अशाच केवळ रकमा, अशा विशेष शीर्षामध्ये जमा करण्यात आणि खर्ची घालण्यात येतील.

आणखी असे की, व्यवस्थापन मंडळास, विशेष ठराव संमत करून कोणतीही रक्कम विद्यापीठ लेख्यातील एका शीर्षाखालून दुसऱ्या शीर्षाखाली तात्पुरती बदली करण्यास प्राधिकृत करता येईल.

१९३४ चा २. (५) विद्यापीठ निधी हा, व्यवस्थापन मंडळाच्या स्वविवेकानुसार स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये
१९४९ चा किंवा 'बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९' याच्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व्ह
१०. बँकेने दिलेली अनुज्ञप्ती धारण करीत असलेल्या, 'भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४' यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेत किंवा त्या प्रयोजनार्थ राज्य
१८८२ चा २. शासनाने मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत ठेवण्यात येईल, अथवा 'भारतीय न्यास अधिनियम, १८८२' याद्वारे प्राधिकृत केलेल्या रोख्यांमध्ये अथवा पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेपर्यंत विद्यापीठाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रयोजनांसाठी स्थापन केलेल्या ग्राहक सहकारी संस्थांना कर्ज देऊन किंवा त्यांचे शेअर्स घेऊन त्यात गुंतविण्यात येईल.

२६. (१) आगामी वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचे वार्षिक वित्तीय अंदाज हे, वित्त अधिकाऱ्याला व्यवस्थापन मंडळाच्या निदेशानुसार व वित्तीय वर्षाच्या प्रारंभाच्या किमान पाच महिने अगोदर तयार करावे लागतील. **वार्षिक वित्तीय अंदाज.**

(२) राज्य शासनाचे जे वित्तीय वर्ष असेल तेच विद्यापीठाचे वित्तीय वर्ष असेल.

(३) वित्तीय अंदाज व्यवस्थापन मंडळाकडे त्याच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

(४) त्यानंतर वित्त अधिकारी हा, वित्तीय विवरणाच्या प्रती कुलपती, राज्य शासन आणि संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे पाठवील.

वार्षिक लेखे व त्यांची लेखापरीक्षा. २७. (१) विद्यापीठाचे वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा विवरण हे, वित्त अधिकाऱ्याला व्यवस्थापन मंडळाच्या निदेशानुसार व वित्तीय वर्ष समाप्त झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत तयार करावे लागेल.

(२) व्यवस्थापन मंडळाने मान्य केलेल्या वार्षिक लेख्यांची राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षा करण्यात येईल.

(३) व्यवस्थापन मंडळाने मान्य केलेले वार्षिक लेखे छापून घेण्यात येतील आणि त्यांच्या प्रतींसह लेखापरीक्षकाच्या अहवालाची एक प्रत आणि लेखापरीक्षकाने त्या आधीच्या अहवालात उपस्थित केलेल्या आक्षेपांवर व मुद्द्यांवर विद्यापीठाने केलेली कार्यवाही दर्शविण्याऱ्या विवरणाची प्रत व्यवस्थापन मंडळ शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत वित्तीय वर्ष समाप्त झाल्यापासून नऊ महिन्यांच्या आत—

(अ) कुलपती;
(ब) राज्य शासन;
(क) संचालक, उच्च शिक्षण; आणि
(ड) राज्य शासनाने नियुक्त केलेला लेखापरीक्षक

यांच्याकडे पाठवील.

(४) राज्य शासन, हे वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे, लेखापरीक्षा अहवाल आणि लेखापरीक्षकाने आपल्या अगोदरच्या अहवालात उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर विद्यापीठाने केलेली कार्यवाही दर्शविणारे विवरणपत्र राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवील.

(५) राज्य शासन, विवक्षित अशा विनिर्दिष्ट कार्यक्रमाच्या किंवा योजनेच्या संबंधात कशा रीतीने लेखे ठेवण्यात यावेत त्या संबंधी विद्यापीठाला निदेश देण्यास किंवा नियमबाह्य गोष्टी केल्यामुळे दोषी असल्याचे लेखापरीक्षकाच्या अहवालात आढळून आलेले विद्यापीठाचे प्राधिकारी, अधिकारी किंवा कोणताही कर्मचारी यांच्याविरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करण्यास राज्य शासन सक्षम असेल आणि विद्यापीठ राज्य शासनाच्या निदेशांनुसार कार्यवाही करील.

वार्षिक अहवाल. २८. (१) विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, व्यवस्थापन मंडळाच्या निदेशांनुसार तयार करण्यात येईल, व त्यात विद्यापीठाने इतर बाबींबरोबरच, आपली उद्दिष्टे पार पाडण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचाही अंतर्भाव केलेला असेल.

(२) अशा तऱ्हेने तयार करण्यात आलेला वार्षिक अहवाल, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी कुलपतींना सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या वार्षिक अहवालाची प्रत राज्य शासनाला सादर करण्यात येईल आणि राज्य शासन, ती शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्याची व्यवस्था करील.

राज्य शासनाचे वित्तविषयक नियंत्रण. २९. (१) राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय, विद्यापीठाला,—

(एक) अधिकाऱ्यांची, अध्यापकांची किंवा इतर कर्मचाऱ्यांची कोणतीही नवीन पदे निर्माण करता येणार नाहीत;

(दोन) आपल्या अधिकाऱ्यांचे, अध्यापकांचे किंवा इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवानिवृत्ती-नंतरचे लाभ व इतर लाभ यांत सुधारणा करता येणार नाही;

(तीन) कोणत्याही विकासविषयक कामावर कोणताही खर्च करता येणार नाही.

(२) राज्य शासन किंवा प्राधिकृत अधिकारी यांच्या पूर्वमान्यतेशिवाय विद्यापीठाने निर्माण केलेले एखादे पद आपल्या अधिकाऱ्यांना, अध्यापकांना किंवा इतर कर्मचाऱ्यांना दिलेले कोणतेही वित्तीय लाभ किंवा कोणत्याही विकासविषयक कामाकरिता केलेला कोणताही खर्च हा, सहायक अनुदान देण्याच्या प्रयोजनार्थ, मान्यता न दिलेला खर्च असल्याचे राज्य शासनाकडून समजण्यात येईल.

३०. (१) विद्यापीठाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याची लेखी कराराने नियुक्ती करण्यात येईल व असा करार हा अधिनियम, परिनियम व आदेश यांच्या तरतुदींशी विसंगत असणार नाही. कर्मचाऱ्याच्या सेवेच्या शर्ती.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशित करण्यात आलेला करार विद्यापीठाकडे ठेवण्यात येईल व त्याची एक प्रत संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात येईल.

३१. (१) कलम ३० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सेवायोजन करारातून विद्यापीठ व कर्मचारी यांच्यात उद्‌भवलेला कोणताही विवाद, त्यांच्यापैकी कोणत्याही पक्षाने केलेल्या विनंतीवरून लवाद न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात येईल. असे लवाद न्यायाधिकरणे हे, व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशित करावयाचा सदस्य, संबंधित कर्मचाऱ्याने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य व कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा पंच यांचे मिळून बनलेले असेल. लवाद न्यायाधिकरण.

१९४० चा २. (२) न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात आलेला असा प्रत्येक विवाद हा, 'लवाद अधिनियम, १९४०' याच्या अर्थान्तर्गत या कलमाच्या अटीवर लवादाला सादर केलेले प्रकरण असल्याचे मानण्यात येईल व त्या अधिनियमाच्या कलम २ व्यतिरिक्त इतर सर्व तरतुदी तदनुसार लागू होतील.

(३) लवाद न्यायाधिकरणाच्या कामकाजाचे विनियमन करण्याची पद्धती परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल.

(४) लवाद न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम व पक्षकारांवर बंधनकारक असेल आणि न्यायाधिकरणाने निर्णय दिलेल्या बाबींसंबंधात त्यांना कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा लावता येणार नाही.

३२. या अधिनियमाच्या आणि परिनियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, विद्यापीठाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण हे, परिनियम, आदेश किंवा विनियम करण्याचा अधिकार खेरीज करून आपले अधिकार आपल्या नियंत्रणाखालील कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे आदेशाद्वारे प्रत्यायोजित करू शकेल, आणि असे प्रत्यायोजन हे, याप्रमाणे प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांचा वापर करण्याची अंतिम जबाबदारी प्रत्यायोजन करणाऱ्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे निहित असण्याचे चालू राहील या अटीवर करण्यात येईल. अधिकारांचे प्रत्यायोजन.

३३. (१) एखादी व्यक्ती, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा इतर विद्यापीठ संस्थेचा सदस्य म्हणून रीतसर निवडून आली आहे किंवा नाही अथवा तसा सदस्य असण्यास ती हक्कदार आहे किंवा नाही यासंबंधात एखादा प्रश्न उद्‌भवल्यास, ती बाब कुलपतीकडे निर्देशित केली जाईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम राहील. विद्यापीठ प्राधिकरणांच्या किंवा विद्यापीठ संस्थांच्या रचनेसंबंधातील विवाद.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणावर किंवा विद्यापीठ संस्थेवर नियुक्त केलेली कोणतीही नामनिर्देशित व्यक्ती किंवा पदसिद्ध सदस्य, ज्यावेळी त्याचे नामनिर्देशन किंवा नियुक्ती संबंधित प्राधिकरणाकडून रद्द करण्यात येईल किंवा तो विद्यापीठाच्या प्राधिकरणाचा किंवा विद्यापीठाच्या संस्थेचा, ज्या पदाच्या आधारे सदस्य होता, ते पद रद्द झाले असेल तर, त्याने आपले पद रिक्त केले असल्याचे समजण्यात येईल.

३४. विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा इतर विद्यापीठ संस्थेच्या सदस्यांमधून (पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त) आकस्मिकरीत्या रिकामी झालेली सर्व पदे ही, ज्या व्यक्तीची जागा रिकामी झाली असेल त्या व्यक्तीस ज्या व्यक्तीने किंवा संस्थेने नियुक्त केलेले असेल, निवडणुकीद्वारे निवडलेले असेल किंवा स्वीकृत करून घेतलेले असेल त्या व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून सोयीप्रमाणे लवकर भरली जातील आणि आकस्मिकरीत्या रिकाम्या झालेल्या पदांकरिता नियुक्त केलेली, निवडून आलेली किंवा स्वीकृत केलेली कोणतीही व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या जागी ती आली असेल ती व्यक्ती जेवढ्या उर्वरित कालावधीकरिता सदस्य म्हणून राहिली असती तेवढ्या कालावधीकरिता अशा प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य म्हणून राहील. आकस्मिकरीत्या रिकामी झालेली पदे भरणे.

पदे रिकामी राहिली तरी विद्यापीठाच्या प्राधिकरणांची किंवा संस्थांची कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही.

३५. कोणत्याही प्राधिकरणाची किंवा कोणत्याही इतर संस्थेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ त्याच्या किंवा तिच्या सदस्यांमधील एक वा अनेक पदे रिकामी आहेत एवढ्याच कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

नुकसानाबद्दल प्राधिकरणे आणि अधिकारी जबाबदार असणे.

३६. (१) विद्यापीठाच्या हितसंबंधाचे योग्य प्रकारे रक्षण करण्यात येत आहे याबद्दल खातरजमा करून घेणे हे, विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाचे आणि अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने हा अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदींशी सुसंगत नसणारी एखादी कृती जर सद्भावनेने केलेली असेल तर तेवढेखेरीज करून, एरव्ही त्या कृतीमुळे किंवा त्यांच्याशी सुसंगत अशी कृती करण्यात कसूर केल्यामुळे किंवा उपरोक्तपणे त्याच्या पक्षी, हेतुपुरस्सर हयगय किंवा कसूर झाल्यामुळे विद्यापीठाची हानी किंवा नुकसान झाले आहे असे आढळून आले तर, परिनियमान्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, अशी कोणतीही हानी किंवा नुकसान यथास्थिती, प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या संबंधित सदस्यांकडून किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून वसुलीयोग्य असेल.

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

३७. विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, या अधिनियमाच्या किंवा परिनियमांच्या किंवा आदेशांच्या कोणत्याही तरतुदींनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल त्यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

विद्यापीठ अभिलेखे पुरावा म्हणून स्वीकारण्याची पद्धती.

३८. विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा समितीची कोणतीही पावती, अर्ज, नोटीस, आदेश, कार्यवृत्ते, ठराव अथवा विद्यापीठाच्या कब्जात असणारे इतर दस्तऐवज अथवा विद्यापीठाने रीतसर ठेवलेल्या कोणत्याही नोंदवहीमधील कोणतीही नोंद यांची प्रत, ती कुलसचिवाने प्रमाणित केलेली असल्यास, भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ यामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बाबतीत त्याची मूळ प्रत सादर केली असता ती पुरावा म्हणून स्वीकारार्ह ठरली असती अशा, तीमध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींच्या व व्यवहारांच्या बाबतीत, पुरावा म्हणून स्वीकारण्यात येईल. १८७२ चा १.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

३९. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून त्याद्वारे, अडचण दूर करण्याच्या दृष्टीने त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाशी विसंगत नसणाऱ्या तरतुदी करता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षे संपल्यानंतर या कलमाखाली असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

संक्रमणकालीन तरतुदी.

४०. हा अधिनियम व परिनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) पहिला कुलगुरु, पहिला कुलसचिव व पहिला वित्त अधिकारी यांची नियुक्ती ही, राज्य शासनाच्या सल्ल्याने कुलपतीकडून केली जाईल आणि त्यांना परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा सेवेच्या अटी व शर्ती लागू होतील :

परंतु, पहिला कुलगुरु हा, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने, नियमित पदावधीसाठी नियुक्त होण्यास पात्र असेल.

(ब) पहिले व्यवस्थापन मंडळ हे किमान एकोणवीस सदस्यांचे मिळून बनलेले असेल; हे सदस्य राज्य शासनाच्या सल्ल्याने कुलपतीकडून नामनिर्देशित केले जातील आणि ते तीन वर्षे पद धारण करतील.

(आय) मुक्त व दूरता शिक्षण पद्धतीकरिता आवश्यक असणाऱ्या अध्यापकांच्या प्रशिक्षणाची तरतूद किंवा व्यवस्था करणे;

(जे) आपल्या विद्यार्थ्यांना समुपदेश व मार्गदर्शन मिळावे याकरिता तरतूद करणे; आणि

(के) राष्ट्रीय एकात्मता व मानवी व्यक्तिमत्वाचा एकात्मीकृत विकास यांना चालना देणे व महाराष्ट्रातील समृद्ध सांस्कृतिक वारसा व समाज सुधारणेची परंपरा पुढे चालवून एकंदर भारतातील व विशेषेकरून महाराष्ट्रातील लोकांच्या संस्कृतीचे संवर्धन करणे;

(ल) विद्यापीठाचा प्रामुख्याने ज्यांवर भर असेल असे गरजेवर आधारित आणि संबंधित व्यावसायिक व तांत्रिक पाठचक्रम तयार करणे, त्यांचा विकास करणे आणि ते देऊ करणे यासाठी आपल्या साधनसंपत्तीच्या मोठ्या भागांची आणि प्रत्यक्ष प्रयत्नांची तरतूद करणे ;

(म) राज्य शासनाच्या अनुदानांवर कमीत कमी प्रमाणात अवलंबून राहणे, आणि प्रारंभीचा पाच वर्षांचा पूर्व तयारीचा कालावधी संपल्यानंतर आपल्या कार्यक्रमासाठी सामाजिक व खाजगी अंशदाने मिळवून आपला खर्च चालविण्यासाठी आणि युनिट चालविण्याच्या खर्चावर फी आकारून त्याद्वारे स्वयंपूर्णतः आणणे ;

(न) यांत्रिकीकरण, संगणकीकरण आणि शिक्षणातील गुणवत्तेला व मानकांना कोणतेही नुकसान न पोचू देता आर्थिकदृष्ट्या कार्यक्षम असे प्रशासन चालवून त्याद्वारे कार्यपद्धतीचा विकास करणे आणि आर्थिक पद्धतीच्या प्रमाणात सुसूत्रता आणणे.

२. हे विद्यापीठ अध्यापन, प्रशिक्षण, संशोधन व विस्तार यांद्वारे वरील उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करील. त्याकरिता, निरनिराळ्या माध्यमांचा व दूरता शिक्षण माध्यमाचा वापर करील, तसेच मुख्यत्वे, मराठी व इंग्रजी भाषेचा शिक्षणाचे माध्यम म्हणून वापर करून ध्वनिप्रक्षेपण, प्रक्षेपणेतर माध्यम, पत्रव्यवहार व अभ्यास केंद्रांचे जाळे यांच्याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याला स्वयंअध्ययनाची सामग्री उपलब्ध करून देईल. तसेच विद्यमान विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने कार्य करील व त्यायोगे ज्ञानार्जन करणाऱ्या समाजाच्या गरजा पूर्ण होतील व प्रस्तुत विद्यापीठ हे विकसित होऊन त्याचे लोकविद्यापीठ तयार होईल; व ते उच्च दर्जाचे, विविधतापूर्ण व संबद्ध शिक्षण देण्याकरिता अत्याधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा व नवीन शैक्षणिक तंत्रशास्त्रांचा पुरेपूर उपयोग करून घेईल.

## दुसरी अनुसूची.

## विद्यापीठाचे परिनियम.

(कलम २४ पहा).

१. **कुलगुरू.**—(१) कुलगुरू हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल.

(२) कुलगुरूची नियुक्ती, खंड (३) अन्वये स्थापन करण्यात येईल अशा समितीने शिफारस केलेल्या, तीनपेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून (वर्णक्रमाने असलेली नावे) कुलपतीकडून केली जाईल :

परंतु, अशा रीतीने शिफारस केलेल्या कोणत्याही व्यक्तीस कुलपतीने मान्यता दिली नाही तर, त्याला समितीची फेररचना करता येईल व नवीन नावे मागविता येतील.

(३) खंड (२) मध्ये निर्देशिलेली समिती तीन सदस्यांची मिळून बनलेली असेल, त्यांच्यापैकी दोन सदस्य व्यवस्थापन मंडळाकडून नामनिर्देशित करण्यात येतील आणि एक सदस्य हा कुलपतीकडून नामनिर्देशित करण्यात येईल आणि कुलपतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ही समितीचा आमंत्रक असेल :

परंतु, जी व्यक्ती विद्यापीठाचा कर्मचारी असेल किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य असेल अशा कोणत्याही व्यक्तीला समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात येणार नाही.

(४) कुलगुरू, तो ज्या तारखेस आपले पद ग्रहण करील त्या तारखेपासून पाच वर्षांची मुदत किंवा वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंतची मुदत यांपैकी अगोदर संपणारी असेल त्या मुदतीपर्यंत पद धारण करील आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, कोणत्याही कुलगुरूची मुदत संपली असली तरीही, कुलपती, तो विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे एकूण पण सर्व मिळून जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीकरिता कोणत्याही कुलगुरूस पद धारण करण्याचे चालू ठेवण्यास फर्मावू शकेल.

(५) कुलगुरूच्या वित्तलब्धी आणि त्याच्या सेवेच्या इतर शर्ती पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) कुलगुरूस दरमहा ७,६०० रुपये वेतन देण्यात येईल आणि त्याच्या पदाच्या संपूर्ण कालावधीत विद्यापीठाची मोटारगाडी विनामूल्य वापरण्याचा आणि, कोणतेही भाडे न देता सुसज्ज निवासगृहाचा वापर करण्याचा त्याला हक्क असेल, आणि अशा निवासगृहाच्या देखभालीच्या बाबतीत कुलगुरूवर व्यक्तिशः कोणताही खर्च पडणार नाही.

(ब) कुलगुरूला, उप-खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेतनाशिवाय विद्यापीठ कर्मचाऱ्यास वेळोवेळी अनुज्ञेय असतील असे आणखी इतर भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

(क) कुलगुरूस, राज्य शासन निश्चित करील असे सेवान्त लाभ व भत्ते मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठाच्या किंवा अशा इतर कोणत्याही विद्यापीठाकडून व्यवस्था पाहिली जात असलेल्या किंवा त्याच्याशी संलग्न असलेल्या कोणत्याही परिसंस्थेच्या कर्मचाऱ्याची कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात येईल त्याबाबतीत, तो ज्या कोणत्या भविष्यनिर्वाह निधीचा सदस्य असेल त्या भविष्यनिर्वाह निधीत अंशदान देण्याची त्याला परवानगी देण्यात येईल आणि विद्यापीठ, भविष्यनिर्वाह निधीतील अशा व्यक्तीच्या खात्यात अंशदान देईल, परंतु या तरतुदीअन्वये, भविष्यनिर्वाह निधीस अंशदान देण्याच्या प्रयोजनार्थ, वेतन म्हणजे त्यास कुलगुरु म्हणून मिळत असलेले वेतन होय :

आणखी असे की, असा कर्मचारी कोणत्याही निवृत्तिवेतन योजनेचा सदस्य असेल तर विद्यापीठ अशा योजनेला आवश्यक ते अंशदान देईल.

(ड) कुलगुरूस, कुलपतीकडून वेळोवेळी मंजूर करण्यात येतील अशा दरांनी प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(ई) कुलगुरूस, त्याने प्रत्यक्ष सेवा केल्याच्या कालावधीच्या एक-अकरांश कालावधीची भरपगारी रजा मिळण्याचा हक्क असेल.

(फ) कुलगुरूस, उप-खंड (ई) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रजेशिवाय आणखी, त्याच्या सेवेच्या पूर्ण झालेल्या प्रत्येक वर्षाकाठी वीस दिवस या दराने अर्धपगारी रजा मिळण्याचा हक्क असेल आणि अर्धपगारी रजा ही, वैद्यकीय कारणांवरून पूर्णपगारी परिवर्तित रजा म्हणून घेता येईल.

(ग) मृत्यू, राजीनामा किंवा अन्य कारणांमुळे कुलगुरूचे पद रिकामे झाल्यास, किंवा आजारपण अथवा इतर कोणतेही कारण यामुळे तो आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ ठरला असेल तर, कुलपती, नवीन कुलगुरू पद ग्रहण करीतोपर्यंत किंवा, यथास्थिती, विद्यमान कुलगुरु त्याच्या पदावर रुजू होईपर्यंत, संचालकासह कोणत्याही योग्य व्यक्तीस कुलगुरू म्हणून कार्य करण्यासाठी नियुक्त करू शकेल.

२. **कुलगुरूचे अधिकार व कामे.**—(१) कुलगुरू हा, व्यवस्थापन मंडळाचा, विद्यापरिषदेचा, नियोजन मंडळाचा आणि वित्त समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

(२) कुलगुरूस विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही सभेस हजर राहण्याचा व तीमध्ये भाषण करण्याचा हक्क असेल, परंतु तो अशा प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य नसेल तर, त्यास अशा सभेत मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(३) हा अधिनियम, परिनियम, आदेश आणि विनियम यांच्या तरतुदींचे यथोचितरीत्या पालन होत आहे हे पाहणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल व असे पालन होत आहे याबद्दल निश्चिती करून घेण्यासाठी आवश्यक असतील असे सर्व अधिकार कुलगुरूस असतील.

(४) कुलगुरूचे विद्यापीठाच्या कामकाजावर नियंत्रण असेल आणि कलम १०, पोट कलम (४) च्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणांचे सर्व निर्णय तो अंमलात आणील.

(५) कुलगुरूला विद्यापीठात योग्य ती शिस्त राखण्यासाठी आवश्यक असे सर्व अधिकार असतील आणि त्यास योग्य वाटेल अशा एका किंवा अनेक व्यक्तींकडे असे कोणतेही अधिकार त्याला सोपविता येतील.

(६) कुलगुरूस विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास रजा मंजूर करण्याबाबतचे आणि अशा अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत त्याची कामे पार पाडण्याकरिता आवश्यक ती व्यवस्था करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येतील.

(७) कुलगुरू, विद्यापीठाच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास नियमांस अनुसरून अनुपस्थिती-रजा देईल आणि असे अधिकार विद्यापीठातील इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविण्याची त्याची इच्छा असेल तर, तो तसे करील.

(८) कुलगुरूस व्यवस्थापन मंडळाच्या, विद्यापरिषदेच्या, नियोजन मंडळाच्या आणि वित्त समितीच्या सभा बोलाविण्याचा किंवा बोलावण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल.

(९) कुलगुरूस पुढील आणखी अधिकार असतील :—

(अ) व्यवस्थापन मंडळाची पूर्व मान्यता घेऊन, आवश्यक असेल त्याप्रमाणे प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते आणि इतर अध्यापक नियुक्त करणे ;

(ब) विद्यापीठाचा कारभार कार्यक्षमतेने चालावा यासाठी आवश्यक असे पाठ्यक्रम लेखक, संहिता-लेखक, समुपदेशी, कार्यक्रम आयोजक, कलाकार आणि आवश्यक वाटतील अशा इतर व्यक्ती नियुक्त करणे ;

(क) एकावेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीच्या, अल्पमुदतीच्या नियुक्त्या करणे; परंतु, विद्यापीठाच्या कारभारासाठी आवश्यक वाटतील अशा व्यक्तींच्या बाबतीत सर्व मिळून जास्तीत जास्त एक वर्ष होईल इतपत ही मुदत पुढे वाढवता येईल;

(ड) वेळोवेळी, आवश्यक वाटतील त्याप्रमाणे, विविध ठिकाणी प्रादेशिक केंद्रे व अभ्यास केंद्रे स्थापन करण्याची व त्यांच्या देखभालीची व्यवस्था करणे आणि त्यांच्या कार्यक्षम कारभाराच्या दृष्टीने आवश्यक असतील असे अधिकार कोणत्याही कर्मचाऱ्याकडे सोपविणे.

३. **संचालक.**— (१) प्रत्येक संचालकाची नियुक्ती ही,—

(अ) नियुक्त करावयाचा उमेदवार हा अगोदर पासूनच विद्यापीठाचा अध्यापक असेल तर कुलगुरूच्या शिफारशींवरून; आणि

(ब) नियुक्त करावयाचा उमेदवार हा विद्यापीठाबाहेरील असेल तर, त्या प्रयोजनासाठी स्थापन केलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून,

व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येईल.

(२) प्रत्येक संचालक हा, विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल.

(३) संचालकांच्या वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील :

परंतु, संचालक हा वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यावर निवृत्त होईल.

(४) संचालक हा, आदेशांद्वारे विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कामे पार पाडील.

४. **कुलसचिव.**— (१) प्रत्येक कुलसचिवाची नियुक्ती ही, त्या प्रयोजनाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येईल आणि तो विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल.

(२) कुलसचिवाच्या वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती कुलपतीच्या संमतीने व्यवस्थापन मंडळाकडून निश्चित करण्यात येतील अशा असतील :

परंतु, कुलसचिव हा वयाची अठ्ठावन्न वर्षे पूर्ण झाल्यावर निवृत्त होईल.

(३) व्यवस्थापन मंडळाने पदनिर्देशित केलेल्या कुलसचिवास, अध्यापक व व्यवस्थापन मंडळ आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील असे इतर सदस्य वगळून, अन्य कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार असतील.

(४) कुलसचिवाने खंड (३) अनुसार दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध, व्यवस्थापन मंडळाने अशा रीतीने पदनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे अपील करण्यात येईल.

(५) ज्या प्रकरणातील चौकशीवरून असे दिसून येईल की, कुलसचिवाच्या अधिकाराबाहेरची शिक्षा देणे आवश्यक आहे त्या प्रकरणात, चौकशीनंतर कुलसचिव, कुलगुरूस योग्य वाटेल अशी कार्यवाही करण्यासंबंधीच्या आपल्या शिफारशींसह, कुलगुरूस अहवाल सादर करील :

परंतु, कुलगुरूच्या कोणतीही शिक्षा लादणाऱ्या आदेशाविरुद्ध व्यवस्थापन मंडळाकडे अपील करता येईल.

(६) व्यवस्थापन मंडळाने पदनिर्देशित केलेला असा कुलसचिव हा,—

(एक) व्यवस्थापन मंडळाचा सचिव असेल,

(दोन) विद्यापरिषदेचा सदस्य-सचिव असेल,

(तीन) नियोजन मंडळाचा सदस्य-सचिव असेल.

(७) (१) याप्रमाणे पदनिर्देशित केलेला कुलसचिव हा,—

(अ) व्यवस्थापन मंडळ त्याच्या हवाली करील असे अभिलेख, सामाईक मोहोर आणि विद्यापीठाच्या इतर मालमत्ता यांचा परिरक्षक असेल ;

(ब) व्यवस्थापन मंडळाला, विद्यापरिषदेला व नियोजन मंडळाला आणि त्या प्राधिकरणांनी नियुक्त केलेल्या समित्यांना सूचना पाठवील व त्यांच्या सभा बोलावील ;

(क) व्यवस्थापन मंडळ, विद्यापरिषद व नियोजन मंडळ यांच्या आणि त्या प्राधिकरणांनी नियुक्त केलेल्या समित्यांच्या सभांची कार्यवृत्ते ठेवील ;

(ड) व्यवस्थापन मंडळ, विद्यापरिषद आणि नियोजन मंडळ यांचे कार्यालयीन कामकाज चालवील व पत्रव्यवहार पाहील ;

(ई) विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या बैठकांच्या कार्यसूच्या निर्गमित झाल्यानंतर लगेच त्याची एक प्रत तसेच अशा बैठकींचे कार्यवृत्त कुलपतीकडे पाठवील ;

(फ) विद्यापीठाच्या वतीने किंवा विरुद्ध असलेल्या दाव्यांमध्ये किंवा कार्यवाहीमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करील, मुखत्यारनाम्यावर सही करील, वादप्रतिवाद पत्रे सत्यापित करील आणि या प्रयोजनार्थ आपला प्रतिनिधी प्रतिनियुक्त करील;

(ग) विद्यापीठाचा वार्षिक अहवाल तयार करील;

(ह) या परिनियमांमध्ये, आदेशांमध्ये किंवा विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील किंवा व्यवस्थापन मंडळाकडून किंवा कुलगुरूकडून वेळोवेळी फर्मविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(७) (२) या कुलसचिवाचे पद रिकामे होईल अथवा कुलसचिव हा आजारपणामुळे अनुपस्थित असेल किंवा इतर कोणत्याही कारणामुळे कुलसचिव म्हणून आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तेव्हा, त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ कुलगुरू नियुक्त करील अशा व्यक्तीकडून ती पार पाडण्यात येतील.

**५. वित्त अधिकारी.**—(१) राज्य शासन, शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या अधिसूचनेद्वारे वित्त अधिकाऱ्याची नियुक्ती करील. त्याची नियुक्ती, राज्य शासन निश्चित करील

अशा कालावधीसाठी आणि अशा अटी व शर्तीवर असेल. तो विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल आणि कुलगुरूच्या नियंत्रणाखाली काम करील.

(२) जेव्हा वित्त अधिकाऱ्याचे पद रिकामे होईल किंवा वित्त अधिकारी हा आजारीपणामुळे अनुपस्थित असेल किंवा इतर कोणत्याही कारणामुळे वित्त अधिकारी म्हणून आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तेव्हा, त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी कुलगुरू नियुक्त करील अशा व्यक्तीकडून ती पार पाडण्यात येतील.

(३) वित्त अधिकारी हा,—

(अ) विद्यापीठाच्या निधींवर सर्वसाधारण देखरेख ठेवील व विद्यापीठाच्या आर्थिक धोरणाबद्दल विद्यापीठास सल्ला देईल ;

(ब) व्यवस्थापन मंडळाकडून त्यास नेमून देण्यात येतील किंवा या परिनियमान्वये किंवा आदेशान्वये विहित करण्यात येतील अशी वित्तविषयक इतर कामे पार पाडील :

परंतु, वित्त अधिकारी हा व्यवस्थापन मंडळाच्या पूर्व मान्यतेशिवाय, कोणताही खर्च करणार नाही किंवा एक लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेची गुंतवणूक करणार नाही.

(४) कुलगुरू आणि व्यवस्थापन मंडळ यांच्या नियंत्रणाच्या अधीन राहून, वित्त अधिकारी—

(अ) विद्यापीठाच्या उद्दिष्टांपैकी कोणतीही उद्दिष्टे पार पाडण्यासाठी, विश्वस्तव्यवस्था व स्थावर मालमत्ता यांसह विद्यापीठाच्या मालमत्ता व गुंतवणुका धारण करील व त्यांचे व्यवस्थापन करील;

(ब) वर्षातील आवर्ती व अनावर्ती खर्च वित्त समितीने त्याबाबत निश्चित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक होणार नाही आणि ज्या प्रयोजनासाठी पैसा मंजूर करण्यात किंवा नेमून देण्यात आला असेल त्यासाठीच तो खर्च केला जात आहे याची निश्चिती करील;

(क) विद्यापीठाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज आणि वार्षिक लेखे तयार करून वित्त समितीने त्यावर विचार केल्यानंतर व्यवस्थापन मंडळास सादर करण्यास जबाबदार असेल ;

(ड) रोख रक्कम व बँकेतील शिल्लक रकमा आणि गुंतवणुका यांवर सतत लक्ष ठेवील ;

(ई) महसूल गोळा करण्याच्या कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवील व महसूल गोळा करण्यासाठी अवलंबिण्यात येणाऱ्या पद्धतीसंबंधी सल्ला देईल;

(फ) विद्यापीठाच्या मालमत्तेसंबंधीच्या नोंदवह्या योग्य रीतीने ठेवल्या जात आहेत आणि विद्यापीठाने चालविलेली प्रादेशिक केंद्रे, अभ्यास केंद्रे, इतर परिसंस्था यांसह विद्यापीठाची कार्यालये यांमधील साधनसामग्री व इतर सामान यांच्या साठ्याची तपासणी केली जात असल्याची निश्चिती करून घेईल ;

(ग) कोणताही अनधिकृत खर्च किंवा इतर वित्तीय नियमबाह्य बाबी कुलगुरूच्या निदर्शनास आणून देईल व कसूरदार व्यक्तींविरुद्ध करावयाची योग्य ती कारवाई सुचवील ;

(ह) आपली कामे पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही माहिती किंवा अहवाल विद्यापीठाने चालविलेली प्रादेशिक केंद्रे, अभ्यास केंद्रे आणि इतर परिसंस्था यांसह विद्यापीठाची कोणतीही कार्यालये यांच्याकडून मागवून घेईल.

(५) वित्त अधिकाऱ्याने किंवा व्यवस्थापन मंडळाने याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी दिलेली कोणतीही पोचपावती ही, विद्यापीठाला देय असलेल्या रकमा चुकत्या झाल्याचे पुरेसे निदर्शक असेल.

६. **व्यवस्थापन मंडळाची रचना.**—(१) व्यवस्थापन मंडळ हे विद्यापीठाचे प्रमुख कार्यकारी प्राधिकरण असेल आणि त्यामध्ये अध्यक्ष व पुढील सदस्य यांचा समावेश असेल :—

(अ) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष;

(ब) सचिव, महाराष्ट्र शासन (उच्च शिक्षण) किंवा उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारा त्याचा प्रतिनिधी;

(क) सचिव, महाराष्ट्र शासन (उद्योग) किंवा उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारी त्याची नामनिर्देशित व्यक्ती;

(ड) सचिव, महाराष्ट्र शासन (कृषि) किंवा उपसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारी त्याची नामनिर्देशित व्यक्ती;

(इ) संचालक, उच्च शिक्षण, किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणारा त्याचा प्रतिनिधी;

(फ) संचालक, तंत्र शिक्षण, किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारा त्याचा प्रतिनिधी;

(ग) संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला त्याचा प्रतिनिधी;

(ह) कुलपतीने नियुक्त करावयाचे दोन कुलगुरू त्यांपैकी एक कृषीतर विद्यापीठाच्या कुलगुरूं-मधून नियुक्त करण्यात येईल व दुसरा कृषी विद्यापीठातील असेल ;

(आय) कुलगुरूने वरिष्ठतेनुसार आळीपाळीने नियुक्त करावयाचा एक संचालक;

(ज) महाराष्ट्र विधानसभेने नामनिर्देशित करावयाचे महाराष्ट्र विधानसभेचे दोन सदस्य;

(के) महाराष्ट्र विधानपरिषदेने नामनिर्देशित करावयाचा महाराष्ट्र विधानपरिषदेचा एक सदस्य;

(ल) कुलपतीने नामनिर्देशित केलेल्या पाच व्यक्ती—त्यांमध्ये (एक) शिक्षण, (दोन) संशोधन, (तीन) उद्योग, (चार) व्यवस्थापन व वाणिज्य आणि (पाच) कृषि व कृषि उद्योग या क्षेत्रांतील विख्यात व्यक्ती यांचा समावेश असू शकेल;

(म) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या कुलगुरुची एक नामनिर्देशित व्यक्ती.

(२) व्यवस्थापन मंडळाच्या सभेची गणपूर्ती सहा सदस्यांनी होईल.

(३) पदसिद्ध सदस्यांखेरीज इतर सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा असेल.

(४) कोणतीही व्यक्ती दोन पदावधींपेक्षा अधिक मुदतीकरिता मंडळाचा सदस्य राहणार नाही.

(५) पदाच्या आधारे सदस्य असलेली व्यक्ती, ती त्या पदावर राहण्याचे बंद झाल्यापासून असा सदस्य असण्याचे बंद होईल.

७. **व्यवस्थापन मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.**—(१) विद्यापीठाचा महसूल व त्याची मालमत्ता यांचे व्यवस्थापन व प्रशासन करण्याचा अधिकार आणि अन्यथा तरतूद केलेली नसेल तर, विद्यापीठाचे सर्व प्रशासनिक कामकाज चालविण्याचा अधिकार व्यवस्थापन मंडळास असेल.

(२) या अधिनियमाच्या, आणि आदेशांच्या तरतुदींच्या अधीन राहून, व्यवस्थापन मंडळास, पुढील अधिकार असतील :—

(अ) अध्यापन व इतर विद्याविषयक कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करणे व प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते आणि विद्यापीठाने कामावर ठेवलेले इतर अध्यापक व विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांची कर्तव्ये व सेवेच्या इतर शर्ती निश्चित करणे;

(ब) अध्यापक व इतर विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्या अर्हता विहित करणे;

(क) शिफारस करण्याच्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून आवश्यक असेल त्यानुसार, प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते आणि इतर अध्यापक व विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्या नियुक्तीस मान्यता देणे;

(ड) कोणत्याही विद्याविषयक कर्मचारीवर्गातील तात्पुरत्या रिकाम्या पदांवर नियुक्ती करण्यास मान्यता देणे ;

(ई) विद्याविषयक कर्मचारीवर्गातील तात्पुरत्या रिकाम्या पदांवर नियुक्ती करण्याबाबतची रीत विनिर्दिष्ट करणे ;

(फ) अभ्यागत प्राध्यापक, सन्मानित प्राध्यापक, सन्मान्य सदस्य, कलावंत आणि लेखक यांच्या नियुक्तीची तरतूद करणे व अशा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती ठरवणे;

(ग) विद्यापीठाची वित्तव्यवस्था, लेखे, गुंतवणुका, मालमत्ता व विद्यापीठाचे इतर सर्व कामकाज यांचे व्यवस्थापन करणे व विनियमन करणे व त्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा अभिकर्त्यांची नियुक्ती करणे ;

(ह) विद्यापीठाने न वापरलेले कोणतेही उत्पन्न धरून विद्यापीठाच्या पैशाची, त्यास योग्य वाटतील असे रोखे, निधी, शेअर्स किंवा कर्जरोखे, यांमध्ये गुंतवणूक करणे अथवा राज्यात स्थावर मालमत्ता खरेदी करण्यामध्ये विद्यापीठाचा कोणताही पैसा गुंतवणे; याबरोबरच अशा गुंतवणुकीत वेळोवेळी बदल करण्याचा तशाच प्रकारचा अधिकार त्याला असेल :

परंतु वित्त समितीशी विचारविनिमय केल्याखेरीज, या खंडान्वये कोणतीही कारवाई करता येणार नाही ;

(आय) वित्त समितीच्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर प्रशासकीय, लिपिकवर्गीय व इतर आवश्यक ती पदे निर्माण करणे आणि त्यांच्या नियुक्तीची पद्धती विनिर्दिष्ट करणे;

(ज) कर्मचाऱ्यांमध्ये परिनियमांनुसार शिस्त घालून देणे व तिची अंमलबजावणी करणे;

(के) विद्यापीठाच्या वतीने कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता हस्तांतरित करणे किंवा हस्तांतरणे स्वीकारणे :

परंतु, कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय हस्तांतरित करता येणार नाही;

(ल) कोणत्याही कारणाने आपणांवर अन्याय झाला आहे असे ज्यांना वाटत असेल अशा विद्यापीठ कर्मचाऱ्यांची व विद्यार्थ्यांची गाऱ्हाणी विचारात घेणे, त्यावर निर्णय देणे व ती दूर करणे;

(म) वित्त समितीशी विचारविनिमय करून पाठ्यक्रम लेखक, समुपदेशक, परीक्षक व समवेक्षक यांना देय असलेले पारिश्रमिक व प्रदेय असलेले प्रवासविषयक व इतर भत्ते निश्चित करणे;

(न) विद्यापीठासाठी सामाईक मोहोर निवडणे आणि तिचा वापर करण्याच्या संबंधात तरतूद करणे;

(ओ) आपले कोणतेही अधिकार, हे कुलगुरू, कुलसचिव, वित्त अधिकारी किंवा विद्यापीठाचा इतर कोणताही अधिकारी, कर्मचारी यांच्याकडे अथवा प्राधिकरणाकडे किंवा त्याने नेमलेल्या समितीकडे सोपविणे;

(प) अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या सुरू करणे ;

(क्यू) हा अधिनियम किंवा परिनियम यांअन्वये प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व त्यास नेमून देण्यात येतील अशी कर्तव्ये पार पाडणे.

(३) व्यवस्थापन मंडळ हे विद्यापीठाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी हा अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांद्वारे अन्यथा कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसेल अशा, विद्यापीठाच्या सर्व अधिकारांचा वापर करील.

८. **विद्यापरिषदेचे अधिकार व कर्तव्ये.**—हा अधिनियम, परिनियम, आदेश आणि विनियम यांच्या अधीन राहून विद्यापरिषदेला या अधिनियमान्वये तिच्याकडे निहित असलेल्या इतर सर्व अधिकारांशिवाय आणखी पुढील अधिकार असतील :—

(अ) विद्यापीठाच्या विद्याविषयक धोरणावर सर्वसाधारण देखरेख करणे आणि शिक्षणाच्या, मूल्यमापनाच्या किंवा संशोधनाच्या पद्धतीविषयी अथवा विद्याविषयक दर्जा सुधारण्यासाठी निदेश देणे ;

(ब) एकतर स्वत: होऊन अथवा नियोजन मंडळाने किंवा व्यवस्थापन मंडळाने निर्देश केल्यावरून सर्वसाधारण विद्याविषयक हितसंबंधांच्या बाबींवर विचार करणे आणि त्यावर योग्य ती कार्यवाही करणे ;

(क) शिस्त, प्रवेश, अधिछात्रवृत्त्या व छात्रवृत्त्या देणे आणि अन्य विद्याविषयक आवश्यक गोष्टी यांसह परिनियम आणि आदेश यांच्याशी सुसंगत असे विनियम आणि नियम तयार करणे; आणि

(ड) हा अधिनियम, परिनियम आणि आदेश यांद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करण किंवा नेमून देण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

९. **नियोजन मंडळ.**—(१) नियोजन मंडळ हे जास्तीत जास्त दहा सदस्यांचे मिळून बनलेले असेल. नियोजन मंडळाच्या सभेची गणपूर्ती चार सदस्यांनी होईल.

(२) कुलगुरू खेरीजकरून नियोजन मंडळाचे सर्व सदस्य ते असे सदस्य झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षांसाठी पद धारण करतील. कोणतीही व्यक्ती दोन पदावधीसाठी सदस्य असणार नाही किंवा असा सदस्य असण्याचे चालू राहणार नाही.

(३) विद्यापीठासाठी योग्य असे कार्यक्रम आणि कार्य यांविषयी योजना तयार करणे व आखणे ही नियोजन मंडळाची जबाबदारी असेल आणि त्याशिवाय, विद्यापीठाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी त्याला आवश्यक वाटतील अशा कोणत्याही बाबीवर व्यवस्थापन मंडळाला आणि विद्यापरिषदेला सल्ला देण्याचा नियोजन मंडळाला अधिकार असेल :

परंतु, नियोजन मंडळ आणि विद्यापरिषद यांच्यात कोणत्याही बाबीवर कोणतीही मतभिन्नता असेल तर, ती बाब व्यवस्थापन मंडळाकडे विचारार्थ पाठवण्यात येईल व व्यवस्थापन मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

(४) नियोजन मंडळास, विद्यापीठाच्या कार्यक्रमाचे नियोजन आणि संनियंत्रण करण्याकरिता आवश्यक वाटेल अशा समित्या स्थापन करता येतील.

(५) नियोजन मंडळ त्याला इष्ट वाटेल अशा कालांतराने सभा घेईल, परंतु ते वर्षातून किमान दोन सभा घेईल.

१०. **वित्त समिती.**—(१) वित्त समिती ही, जास्तीत जास्त सात सदस्यांची मिळून बनलेली असेल.

(२) कुलगुरू खेरीजकरून वित्त समितीचे सर्व सदस्य, ते ज्या तारखेस समितीचे सदस्य झाले असतील त्या तारखेपासून तीन वर्षांसाठी पद धारण करतील.

(३) वित्त समितीच्या सभेची गणपूर्ती चार सदस्यांनी होईल.

(४) वित्त समितीही, लेख्यांची परीक्षा करण्यासाठी आणि खर्चाची छाननी करण्यासाठी वर्षातून किमान तीन वेळा सभा घेईल.

(५) वेतनश्रेणींची सुधारणा, वेतन श्रेणींमध्ये वाढ करणे यासंबंधीचे सर्व प्रस्ताव आणि अर्थसंकल्पामध्ये ज्यांचा समावेश केलेला नाही अशा बाबी, यांवर व्यवस्थापन मंडळाकडून विचार केला जाण्यापूर्वी वित्त समिती त्यांची तपासणी करील.

(६) वित्त अधिकाऱ्याने तयार केलेला विद्यापीठाचा वार्षिक लेखा आणि वित्तीय अंदाज हे, विचारार्थ व अभिप्रायार्थ वित्त समितीच्या पुढे ठेवण्यात येतील. आणि त्यानंतर, समितीने निश्चित केलेल्या एकूण कमालमर्यादेच्या आत व्यवस्थापन मंडळाला सादर करण्यात येतील.

(७) वित्त समिती विद्यापीठाची प्राप्ती आणि साधनसंपत्ती यांवर आधारित अशा वर्षाच्या एकूण आवर्ती आणि अनावर्ती खर्चाची मर्यादा निश्चित करील आणि विद्यापीठ अशा रीतीने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक खर्च करणार नाही.

११. **अध्यापकांसाठी निवड समित्या.**—(१) विद्यापीठाचे प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते आणि इतर विद्याविषयक कर्मचारीवर्ग आणि विद्यापीठाकडून चालविण्यात येणाऱ्या परिसंस्थांचे प्रमुख यांच्या पदांवरील नियुक्तीकरता, व्यवस्थापन मंडळाला शिफारस करण्यासाठी, निवड समित्या असतील.

(२) प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याते आणि विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्या पदांवरील नियुक्तीकरिता असणारी प्रत्येक निवड समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल,—

(अ) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष ;

(ब) कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेला संचालक;

(क) कुलपतींनी नामनिर्देशित केलेली व्यक्ती ; आणि

(ड) आदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशित केलेले विद्यापीठाशी संबंधित नसलेले तीन तज्ञ;

(ई) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कुलगुरूकडून नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती.

(३) निवड समितीच्या सभेची गणपूर्ती चार सदस्यांनी होईल. अशा सदस्यांमध्ये किमान दोन तज्ञांचा समावेश असेल.

(४) निवड समितीने शिफारस करताना अनुसरावयाची कार्यपद्धती ही आदेशांमध्ये ठरवून देण्यात येईल त्यानुसार असेल.

(५) व्यवस्थापन मंडळास निवड समितीने केलेली शिफारस स्वीकारणे शक्य नसेल तर ते अशा अस्वीकृतीबद्दलची आपली कारणे नमूद करील आणि अंतिम आदेशांकरिता ते प्रकरण कुलपतीस सादर करील.

१२. **निमंत्रणाद्वारे नियुक्तीची विशेष पद्धती.**—(१) या परिनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व्यवस्थापन मंडळास, उच्च दर्जाचे विद्याप्रावीण्य मिळविलेल्या आणि व्यावसायिक नैपुण्य संपादन केलेल्या व्यक्तीस, विद्यापीठामधील प्राध्यापक किंवा प्रपाठक किंवा त्याच्याशी समतुल्य अशा विद्याविषयक पदाचा स्वीकार करण्याकरिता, त्यास, योग्य वाटेल अशा अटींवर व शर्तींवर बोलावता येईल आणि अशा पदावर अशा व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

(२) व्यवस्थापन मंडळास, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या रीतीस अनुसरून त्याच्याकडून निर्धारित करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर, अध्यापनासाठी किंवा एखादा प्रकल्प अथवा कोणतीही कामगिरी हाती घेण्याकरिता, कोणत्याही इतर विद्यापीठात किंवा संघटनेत काम करणाऱ्या कोणत्याही अध्यापकाची किंवा इतर विद्याविषयक कर्मचारीवर्गाची नियुक्ती करता येईल.

१३. **नियत कालावधीकरता नियुक्ती करण्याची विशेष पद्धती.**—व्यवस्थापन मंडळास, त्यास योग्य वाटेल अशा अटींवर व शर्तींवर, परिनियम ११ व १२ यांमध्ये ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीस अनुसरून निवड केलेल्या व्यक्तीची नियत कालावधीसाठी नियुक्ती करता येईल.

१४. **अध्यापकांव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी निवड समिती.**—(१) अधिकाऱ्यांच्या पदांवर नियुक्ती करण्यासाठी असणारी निवड समिती ही, अध्यक्ष व पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष ;

(दोन) व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशित केलेल्या व विद्यापीठांशी संबंधित नसलेल्या दोन नामनिर्देशित व्यक्ती ;

(तीन) कुलपतींची एक नामनिर्देशित व्यक्ती ;

(चार) व्यवस्थापन मंडळाचा सदस्य असेल असा संचालक ;

(पाच) संचालक, उच्च शिक्षण ;

(सहा) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कुलगुरूंची एक नामनिर्देशित व्यक्ती.

कुलसचिव हा निवड समितीचा सचिव म्हणून काम पाहील. निवड समितीची गणपूर्ती चार सदस्यांनी मिळून होईल.

(२) अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांच्या पदांवरील नियुक्तीसाठी असणारी निवड समिती अध्यक्ष व पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) कुलगुरूने नामनिर्देशित केलेला संचालक—अध्यक्ष ;

(दोन) व्यवस्थापन मंडळाने नामनिर्देशित केलेला एक अध्यापक ;

(तीन) कुलसचिव.

(३) शिफारस करताना निवड समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती आदेशांमध्ये ठरवून देण्यात येईल त्यानुसार असेल.

९ee

(४) कुलगुरू हा अध्यापक किंवा कर्मचारी यांची जास्तीत जास्त सहा महिने एवढ्या कालावधीसाठी तात्पुरती रिकामी झालेली जागा, वरील कार्यपद्धतीचा अवलंब न करता भरण्यास सक्षम असेल.

१५. **मान्यताप्राप्त अध्यापक.**—(१) इतर विद्यापीठे, परिसंस्था किंवा संघटना यांमध्ये अध्यापक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींना मान्यता देण्यासाठी लागणाऱ्या अर्हता आदेशांद्वारे विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

(२) अध्यापकांना मान्यता देण्याची रीत, मान्यतेचा कालावधी आणि मान्यता काढून घेणे या गोष्टी आदेशांद्वारे विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

१६. **समित्या.**— (१) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणास, त्यास योग्य वाटतील एवढ्या स्थायी किंवा विशेष समित्या नियुक्त करता येतील आणि ज्या व्यक्ती अशा प्राधिकरणाच्या सदस्य नाहीत त्या व्यक्तींची अशा समित्यांवर नियुक्ती करता येईल.

(२) खंड (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही समितीस, तिच्याकडे सोपवलेला कोणताही विषय हाताळता येईल, मात्र नंतर त्यावर समितीची नियुक्ती करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडून शिक्कामोर्तब व्हावे लागेल.

१७. **विद्यापीठाचे अध्यापक व इतर विद्याविषयक कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांची आचारसंहिता.**—(१) विद्यापीठाचे सर्व अध्यापक व इतर विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांना, परिनियम व आदेश यांमध्ये विहित केलेल्या सेवेच्या अटी व शर्ती व आचारसंहिता या विरुद्ध कोणताही करार केलेला नसेल तर, लागू होतील.

(२) विद्यापीठाचा प्रत्येक अध्यापक व विद्याविषयक कर्मचारी यांची नियुक्ती लेखी करारावर करण्यात येईल; कराराचा नमुना कुलपतीच्या मंजूरीने व्यवस्थापन मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(३) खंड (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक कराराची प्रत कुलसचिवाकडे ठेवण्यात येईल.

१८. **विद्यापीठाच्या इतर कर्मचारीवर्गाच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांची आचारसंहिता.**—विद्यापीठाचे अध्यापक व विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्याव्यतिरिक्त, विद्यापीठाच्या इतर सर्व कर्मचाऱ्यांना, परिनियम व आदेश या विरुद्ध असा कोणताही करार केलेला नसेल तर, यांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा सेवेच्या अटी व शर्ती आणि आचारसंहिता लागू होतील.

१९. **विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना पदावरून दूर करणे.**—(१) विद्यापीठाचे अध्यापक, विद्याविषयक कर्मचारी किंवा इतर अधिकारी अथवा कर्मचारी यांनी गैरवर्तणूक केली असे त्यांच्याविरुद्ध अभिकथन करण्यात आले असेल त्याबाबतीत, अध्यापक व इतर विद्याविषयक कर्मचारी यांच्या बाबतीत कुलगुरू व इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, नियुक्ती करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी किंवा अधिकारी, (यात यापुढे ज्याचा निर्देश "नियुक्ती प्राधिकारी" असा करण्यात आला आहे) लेखी आदेशाद्वारे अशा अध्यापकाविरुद्ध, विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्तीविरुद्ध किंवा इतर कर्मचाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करू शकेल आणि कोणत्या परिस्थितीत असा लेखी आदेश दिला ते, व्यवस्थापन मंडळास ताबडतोब कळवील.

(२) कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या कराराच्या अटींमध्ये आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यापक व इतर विद्याविषयक कर्मचारीवर्ग यांच्याबाबतीत व्यवस्थापन मंडळास आणि इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नियुक्ती प्राधिकरणास, अध्यापकाला, विद्याविषयक कर्मचाऱ्याला किंवा यथास्थिति इतर कर्मचाऱ्याला गैरवर्तणुकीच्या कारणावरून पदावरून दूर करण्याचा अधिकार राहील.

(३) कोणत्याही अध्यापकास, विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्तीस किंवा इतर कर्मचाऱ्यास, त्याच्याविरुद्ध करण्याचे योजिलेल्या कारवाईच्या बाबतीत कारण दाखवण्याची वाजवी संधी दिल्या-खेरीज, खंड (२) अन्वये पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(४) अध्यापक, विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्ती किंवा इतर कर्मचारी यांना पदावरून दूर करण्यासंबंधीचा आदेश काढल्याच्या तारखेपासून पदावरून दूर करण्यात येईल :

परंतु, अध्यापक, विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्ती किंवा इतर कर्मचारी याला पदावरून दूर करण्याच्या वेळी तो निलंबित असेल त्याबाबतीत, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून त्याला पदावरून दूर करण्यात येईल.

(५) या परिनियमाच्या पूर्ववर्ती तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यापकास, विद्याविषयक कर्मचाऱ्यास किंवा इतर कर्मचाऱ्यास आपल्या पदाचा राजीनामा पुढील प्रकारे देता येईल,—

(अ) तो स्थायी कर्मचारी असल्यास, व्यवस्थापन मंडळास किंवा यथास्थिति नियुक्ती प्राधिकरणास तीन महिन्यांची नोटीस देऊन अथवा त्याऐवजी तीन महिन्यांचे वेतन देऊन ;

(ब) तो स्थायी कर्मचारी नसल्यास, यथास्थिति व्यवस्थापन मंडळास किंवा नियुक्ती प्राधिकरणास एका महिन्याची नोटीस देऊन अथवा एका महिन्याचे वेतन देऊन;

परंतु असा राजीनामा, व्यवस्थापन मंडळाने किंवा यथास्थिति नियुक्ती प्राधिकरणाने तो स्वीकारल्याच्या तारखेसच केवळ अंमलात येईल.

२०. **विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखणे.**—(१) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमधील शिस्त व त्यांच्या विरुद्धची शिस्तभंगाची कारवाई यासंबंधीचे अधिकार कुलगुरूकडे निहित असतील. कुलगुरूस, त्यास योग्य वाटतील असे स्वतःचे सर्व किंवा कोणतेही अधिकार दुसऱ्याकडे सोपविता येतील.

(२) शिस्त राखणे आणि शिस्त राखण्यासाठी त्यास समुचित वाटेल अशी कारवाई करणे यासंबंधीच्या अधिकारांच्या व्यापकतेस बाध येऊ न देता, कुलगुरू आपल्या अधिकारांचा वापर करून आदेशाद्वारे असा निदेश देऊ शकेल की, कोणत्याही एका किंवा अनेक विद्यार्थ्यांची हकालपट्टी करण्यात यावी किंवा त्यांना विनिर्दिष्ट कालावधीपर्यंत काढून टाकण्यात यावे अथवा विद्यापीठाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या पाठ्यक्रमासाठी किंवा पाठ्यक्रमांसाठी आदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीपर्यंत प्रवेश देण्यात येऊ नये अथवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल एवढ्या रकमेची दंडाची शिक्षा करण्यात यावी किंवा विद्यापीठाकडून किंवा मान्यताप्राप्त संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षेस किंवा परीक्षांना बसण्यास एक किंवा त्याहून अधिक वर्षाच्या कालावधीपर्यंत मनाई करण्यात यावी अथवा संबंधित विद्यार्थी/विद्यार्थिनी ज्या परीक्षेस बसला/बसली असेल त्या परीक्षेचा त्याचा/तिचा निकाल रद्द करण्यात यावा.

(३) मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्रमुखाला, आपापली परिसंस्था योग्य रीतीने चालावी यासाठी आवश्यक वाटतील असे सर्व शिस्तविषयक अधिकार आपल्या परिसंस्थेतील विद्यार्थ्यांच्या बाबतीत वापरण्याचा प्राधिकार राहील.

२१. **विद्यापीठाची झालेली हानी किंवा नुकसान भरून काढण्याची कार्यपद्धती.**—(१) कुलपतीने केलेल्या निर्देशावरून किंवा अन्यथा जर व्यवस्थापन मंडळास, कोणत्याही वेळी असे दिसून आले की (व्यवस्थापन मंडळाव्यतिरिक्त), विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा (कुलपती, कुलगुरू यांव्यतिरिक्त) अधिकारी किंवा अन्य कर्मचारी याने बुद्धिपुरस्सर हयगय केल्यामुळे किंवा कसूर केल्यामुळे, हा अधिनियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदींशी अनुरूप नसेल अशी कोणतीही कृती घडल्याने विद्यापीठाची हानी झाली आहे किंवा नुकसान झाले आहे, तर व्यवस्थापन मंडळ याबाबतीत चौकशी अधिकारी किंवा चौकशी समिती नेमण्याजोगी आहे काय आणि झालेल्या हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल जबाबदारी निश्चित करण्याजोगे सकृत्दर्शनी ते प्रकरण आहे किंवा काय हे ठरविण्यासाठी प्राथमिक चौकशी करील. कुलपतीकडून निदेश केला गेल्यावर प्राथमिक चौकशी करण्यात आली असेल त्याबाबतीत, व्यवस्थापन मंडळ, कुलपतीने ठरवून दिलेल्या काल-मर्यादेत अशा चौकशीचा अहवाल सादर करील.

(२) सकृत्दर्शनी ते प्रकरण, चौकशी करण्याजोगे आहे याबद्दल व्यवस्थापन मंडळाची स्वतःची खात्री झाल्यास किंवा कुलपतीकडून तशा अर्थाचा निदेश मिळाला असेल तेव्हा, व्यवस्थापन मंडळ चौकशीच्या प्रयोजनासाठी एका किंवा अधिक व्यक्तींची मिळून बनणारी चौकशी समिती नेमील आणि चौकशीसाठी पुढील विषय निश्चित करून त्याप्रमाणे चौकशी करील :—

(एक) तक्रारीची चौकशी करणे,

(दोन) झालेली हानी किंवा नुकसान निर्धारित करणे,

209

(तीन) हानीस किंवा नुकसानीस जबाबदार असणारे प्राधिकरण, प्राधिकरणाचे सदस्य किंवा अधिकारी किंवा कर्मचारी निश्चित करणे आणि

(चार) संबंधित प्राधिकरण, सदस्य किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून किती रक्कम वसूल करावी त्याची शिफारस करणे.

समिती आपल्या कार्यपद्धतीचे विनियमन स्वतःच करील.

(३) आवश्यक ती चौकशी केल्यानंतर समिती, व्यवस्थापन मंडळाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत किंवा वाढीव मुदतीत आपला अहवाल व्यवस्थापन मंडळाला सादर करील. कुलपतीच्या निदेशानुसार समिती नियुक्त करण्यात आली असेल त्याबाबतीत, व्यवस्थापन मंडळ त्या समितीच्या अहवालाची एक प्रत कुलपतीकडे पाठवील.

(४) समितीचा अहवाल मिळाल्यावर व्यवस्थापन मंडळ त्यावर विचार करील. कोणतेही प्राधिकरण, सदस्य किंवा अधिकारी किंवा अन्य कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही करणे आवश्यक आहे असे व्यवस्थापन मंडळास वाटल्यास, ते त्या प्राधिकरणास, सदस्यास किंवा संबंधित अधिकाऱ्यास किंवा अन्य कर्मचाऱ्यास त्याच्याविरुद्ध असलेले आरोप व त्याच्याकडून वसूल करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेली रक्कम यासंबंधी त्या प्राधिकरणास कळवील. व्यवस्थापन मंडळ, प्राधिकरण, सदस्य किंवा संबंधित अधिकारी किंवा अन्य कर्मचारी यांना या आरोपांच्या व त्याच्याकडून वसूल करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेल्या रकमेच्या संबंधात अभिवेदन करण्याची वाजवी संधी देईल.

(५) अशी संधी दिल्यानंतर, कोणती कार्यवाही व ती कोणाविरुद्ध केली पाहिजे ते व्यवस्थापन मंडळ ठरवील व अशा निर्णयात, प्राधिकरण, सदस्य किंवा संबंधित अधिकारी किंवा अन्य कर्मचारी यांच्याकडून येणे असलेली व वसूल करावयाची रक्कम प्रमाणित करील. कुलपतीच्या निर्देशावरून समितीने चौकशी केली असेल अशा कोणत्याही प्रकरणी, कोणतीही कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल त्याबाबतीत कुलपतीची पूर्वमान्यता घेण्यात येईल.

(६) प्राधिकरणाकडून, सदस्याकडून किंवा अधिकाऱ्याकडून किंवा अन्य कर्मचाऱ्याकडून जी कोणतीही रक्कम येणे असल्याचे व्यवस्थापन मंडळाने प्रमाणित केले असेल ती रक्कम असे प्राधिकरण, सदस्य, अधिकारी किंवा यथास्थिति अन्य कर्मचारी यास, व्यवस्थापन मंडळाचा निर्णय मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत विद्यापीठाकडे चुकती करावी लागेल. तदनुसार रक्कम प्रदान करण्यात त्याने कसूर केल्यास, विद्यापीठ ती रक्कम, अशा कसूरदारास द्यावयाच्या पारिश्रमिकातून किंवा कसूरदाराविरुद्ध न्यायालयात वैध कार्यवाही दाखल करून वसूल करील.

(७) (अ) व्यवस्थापन मंडळाने किंवा त्याच्या कोणत्याही सदस्याने किंवा कुलगुरूने विद्यापीठाचे असे नुकसान किंवा हानी केली असेल त्याबाबतीत, कुलपतीस, तक्रार आल्यावरून किंवा अन्यथा त्याबाबतीत चौकशी करण्याच्या व तो विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत किंवा वाढीव मुदतीत आपणांकडे अहवाल सादर करण्याच्या प्रयोजनाकरिता एका किंवा त्याहून अधिक सदस्यांची मिळून बनलेली एक चौकशी समिती नियुक्त करता येईल.

(ब) समितीचा अहवाल मिळाल्यावर, कुलपती व्यवस्थापन मंडळास किंवा तिच्या कोणत्याही सदस्यास किंवा यथास्थिति कुलगुरूस त्याच्याविरुद्ध असलेल्या आरोपांची माहिती कळविल्यानंतर व त्या आरोपांच्या संबंधात त्या प्राधिकरणास, सदस्यास किंवा कुलगुरूस अभिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, कोणती कार्यवाही व ती कोणाविरुद्ध केली जावी याचा निर्णय देईल व अशा निर्णयात तो, व्यवस्थापन मंडळ किंवा त्याचा कोणताही सदस्य किंवा यथास्थिति कुलगुरू यांच्याकडून येणे असलेली व त्याच्याकडून वसूल करावयाची रक्कम विनिर्दिष्ट करील.

(क) व्यवस्थापन मंडळ किंवा त्याचा कोणताही सदस्य किंवा यथास्थिति कुलगुरू यांच्याकडून जी कोणतीही रक्कम येणे असल्याचे कुलपतीने प्रमाणित केले असेल ती रक्कम ते प्राधिकरण, तो सदस्य किंवा संबंधित अधिकारी, याला कुलपतीचा निर्णय मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत विद्यापीठाकडे चुकती करावी लागेल. तदनुसार रक्कम चुकती करण्यात त्याने कसूर केल्यास, विद्यापीठ ती रक्कम कसूरदारास द्यावयाच्या पारिश्रमिकातून किंवा कसूरदाराविरुद्ध न्यायालयात वैध कार्यवाही दाखल करून वसूल करील.

(यथार्थ अनुवाद),

प. ग. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.